# प्रयत्नांती परमेश्वर

सौ. अरुंधती बापट
ॲड. विद्यानंद ओगले



ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

बालकथासंग्रह

# प्रयत्नांती परमेश्वर

## अरुंधती बापट
## विद्यानंद बाळकृष्ण ओगले

# या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!

# प्रयत्नांती परमेश्वर

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो, मजा येते.

पण

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हाला आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना आमच्याबद्दल मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# प्रयत्नांती परमेश्वर


## अरुंधती अरविंद बापट

१० सावली अपार्टमेंट्स, प्रभात फिल्म कंपनी मार्ग, लॉ कॉलेज रस्ता, एरंडवन, पुणें ४११००४
ph 020 25464804/ Mo 9423003528
e-mail - arundhati@bapat.net

## विद्यानंद बाळकृष्ण ओगले

८२३७८८१०३२
पत्ता -- श्री विद्यानंद ओगले, शिरीष अपार्टमेंट्स, सदनिका नं ७, प्लॉट नं ६६, रामदासपेठ नागपूर १०
vbogale48@gmail.com



या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखक व लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी त्यांची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

www.esahity.in

esahity@gmail.com

प्रकाशन : २२ ऑगस्ट २०२१ (रक्षाबंधन)

©esahity Pratishthan®2021

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

लेखिकेचा परिचय



मी सौ अरुंधती अरविंद बापट. पूर्वाश्रमीची विजया बाळकृष्ण ओगले. मानसशास्त्र हा माझ्या विषयात masters degree (MA) घेतली. माझे BA पर्यंतचे शिक्षण नागपूर येथे झाले. मराठी माध्यमातून शिकलेली मी, MA ला इंग्लिश माध्यम घेतल्याने, खूप प्रयत्न करावे लागले. पण अथक प्रयत्नांमुळे मी मेरिट घेऊन पास झाले.

त्याआधीच मी लेखनाला सुरवात केली होती. लिहिण्याची प्रेरणा मला माझी आई – सौ शकुंतला बाळकृष्ण ओगले, हिच्याकडून मिळाली. हे पुस्तक लिहून मी मातृऋणाचा सन्मान करते आहे, असं मला वाटतं. कारण मातृऋण कधी फेडता येईल असं मला वाटत नाही.

पहिला लेख मी बालगुन्हेगारीवर लिहिला होता. त्या लेखाला कॉलेजमध्ये पहिले बक्षीस मिळाले होते. त्यानंतर नागपूरच्या लहानमोठ्या वर्तमानपत्रात मी छोटेमोठे लेख लिहीत असे. नागपूर

आकाशवाणीवरही बालविहारमध्ये माझे अनेक कार्यक्रम होत असत.

लग्नानंतर मात्र माझ्या लिखाणात खंड पडला. साधारणपणे १९७३ ते १९७५ याकाळात मी पुन्हा लेखनाला सुरवात केली अनेक मासिकांमधून माझ्या गोष्टी व कविता छापून येत असत. या काळात मी मा. शांताबाई किर्लोस्करांबरोबर महाराष्ट्र पालक शिक्षक संघाचे त्रैमासिक, " पालक - शिक्षक या मासिकाच्या संपादनाचे काम करीत असे. त्यातून मला प्रेरणा मिळाली. मग मी नापास मुलांच्याकरता एक विशेष वर्ग सुरु केला. मला असं वाटायचं की मुलं अभ्यासात मागे पडतात ती केवळ ती बुद्धीने कमी असतात किंवा अभ्यास करत नाही असं नव्हे. तर त्याच्या मागे इतरही काही कारणं असू शकतात. घरचं वातावरण, खूप लाड, पालकांचं दुर्लक्ष, वर चढवल्यामुळे मागचा अभ्यास कच्चा असणे. मी प्रत्येक मुलाचा अभ्यास करून त्याच्या मागे पाडण्याचे संभाव्य कारण शोधून, त्याच्या पालकांशी चर्चा करीत असे. अशा अनेक मुलांना मी अभ्यासात वर आणले आहे. त्यातून मुलांची वाढ व विकास या बद्दल एक सोपेसे पुस्तक लिहिण्याचा विचार मनात आला. तो विचार मी प्रत्यक्षातही आणला. त्याबद्दल पुन्हा केव्हांतरी.

यानंतर मी लेखन करीत असे, पण ते प्रसिद्ध करण्याकडे माझा कल नव्हता. आज माझ्या या कथा वाचकांपर्यंत पोहोचवतांना मला मनोमन आनंद होतो आहे. पहिल्यांदाच माझ्या कथा वाचकांपर्यंत पोहोचत आहेत, त्या वाचकांच्या पसंतीला उतरतील अशी आशा करते. मी मानसशास्त्र शिकले आहे.

**अरुंधती अरविंद बापट**

# ॲडव्होकेट विद्यानंद बाळकृष्ण ओगले, नागपूर



घरांतच वर्तमानपत्राचा भलामोठा व्याप असल्याने साहजिकच मी वयाच्या १४व्या वर्षी त्यांत शिरलो आणि सगळी मुद्रणकला साध्य करून घेतली. मी बी.एस्सी. नंतर बॅचलर ऑफ जर्न्यालिझम आणि एल.एल.बी. (वकिली) शिकलो. वडिलांनी मला सांगितले होते की, आयुष्य सामान्य पध्दतीनी न जगता वैविध्यानी जगायचे. म्हणून मी तर्कशास्त्रानी विचार करून वेगवेळया मार्गानी प्रयोग करून प्रत्येकच घटनेला वेगळीच दिशा देण्याचा प्रयत्न करीत असे.

सुदैवानी जशा इसापाच्या गोष्टी आपलं मन आकर्षण करून घेतात, तसेच माझ्या अनेक घटना सुरू कुठे होतात आणि त्याचा शेवट अकल्पित रीतीनी होतो, असा अनुभव आला. जनसानमान्यांना कळावा म्हणून ३५० घटनांचा उहापोह करून ४ पुस्तकं तयार केलेली आहेत.

मात्र बालकांसाठी अनेक गोष्टी स्वरचित, स्वानुभवलेल्या सांगता सांगता त्यांतल्या कांही “प्रयत्नांती परमेश्वर” पुस्तकाद्वारा मुलांसाठी प्रकाशित करीत आहे.

**ॲडव्होकेट विद्यानंद बाळकृष्ण ओगले**

# अर्पणपत्रिका

हे पुस्तक प्रकाशित करतांना मला द्विगुणित आनंद होतो आहे. पुस्तक प्रकाशनाचा आनंद तर आहेच, पण त्याबरोबरच मी आणि माझा धाकटा भाऊ विद्यानंद बाळकृष्ण ओगले, मिळून हे पुस्तक प्रकाशित करतो आहोत याचा मला अधिक आनंद होतो आहे. जीवनाच्या धकाधकीत आमच्यांत कटूपणा येईल असे प्रसंग येणं अटळ. पण पण **"नाते"="नाहि ते"= "नाहि परके"="नाहि दुसरे"="म्हणजे "एकत्व पावलेलं", असं आमचं नातं एकसंध टिकून राहिलेलं आहे, ही भाग्याची गोष्ट.** आमच्या नात्यांतला गोडवा अजून टिकून आहे, याचाच आनंद जास्त आहे.

आम्ही जीवनावर प्रेम करणारी माणसं. आमचं एक एक नातवंडं म्हणजे

आभाळीच्या चंद्राइतकं हवंहवंसं असणारं; अशा आमच्या

लाडक्या नातवंडांना गोष्टी सांगता सांगता,

ह्या पुस्तकाचा जन्म झाला.

त्यांना हे पुस्तक

समर्पण.



**प्रयत्नांती परमेश्वर**

कथा लेखन

## विद्यानंद ओगले

शेंडे बुडखे

आगपेटीच्या काडीचा खराखुरा मार

जो दुसऱ्यावर विश्वासाला

राम  आणि श्याम

## अरुंधती बापट

राजकन्येला दाढीमिशा

श्रमाची महती

गोष्ट सदाची

गाढवापुढे वाचली गीता

भागाबाईचा मळा

थेंबभर पाणी

प्रयत्नांती परमेश्वर

अनुक्रमणिका

०१. राम आणि श्याम

०२. आगपेटीच्या काडीचा खराखुरा मार

०३. गाढवापुढे वाचली गीता,कालचाच गोंधळ बरा होता-

०४. गोष्ट सदाची

०५. जो दुसऱ्यावरी विसंबला त्याचा कार्यभाग बुडाला पान

०६. थेंबभर पाणी

०७. राजकन्येला दाढीमिशा

०८. शेंडे बुडखे रेडुकाला

०९. भागाबाईचा मळा

१०. श्रमाची महती

# १. राम आणि श्याम

राम आणि श्याम सख्खे भाऊ होते. त्याची घरं शेजारी शेजारी होती. राम प्रामाणिक आणि सरळ स्वभावाचा होता. मात्र शाम लबाड होता. राम खरं बोलायचा, तर शाम सर्रास खोटं बोलायचा. राम आणि शाम यांच्या सामायिक मालकीची कांही झाडं होती आणि एक गाय होती. शामच्या मनांत लबाडी होती. म्हणून त्यानी रामदादाला सुचवलं की, “आपण झाडांची आणि गाईची वाटणी करूया”. राम म्हणाला, “कशाला वाटणी करायची”? तर शाम म्हणाला, “वाटणी केली की, भांडण होणार नाही. ज्यानी त्यानी आपल्या वाटणीच्या भागांतून होणारा फायदा घ्यायचा.”

श्याम म्हणाला की, “आपण गाय आणि झाडं अर्धी अर्धी वाटून घेऊ या. रामनी ती गोष्टं मान्य केली. तरीही त्याला प्रश्न पडला,की गाय कशी वाटून घेणार? श्याम हंसला. तो म्हणाला कापायचं कांहीच नाही. झाडं आहेत एकवीस. ती अर्धी अर्धी कशी वाटता येणार? म्हणून आपण झाडांचेहि अर्धे अर्धे भाग करायचे. झाडाचा वरचा भाग आणि खालचा भाग. अशी नुसती वाटणी

करायची. ज्याच्या वाटणीच्या भागांतून जे मिळेल ते त्यानी एकट्यानी घ्यायचं. म्हणजे आपल्यांत कधीच भांडणं होणार नाही. राम भाबडा होता. त्यानी ते मान्य केलं.



मग श्यामने त्याला वाटणी कशी करायची ते सांगितलं. तो म्हणाला, “झाडांचा जाडजूड बुंधा असलेला भाग तुझ्या वाटणीचा; आणि तुला गाय आवडते, रोज तू तिच्या तोंडावर आणि पाठीवर हात फिरवतोस म्हणून गायीच्या तोंडापासून समोरचा अर्धा भागही तुझा. झाडाच्या बारक्या बारक्या फांद्या असलेला झाडांचा वरचा भाग माझा; आणि गाईचा शेपटी

असलेला मागचा अर्धा भाग माझा". राम सरळ स्वभावाचा होता म्हणून शामने सुचवलेल्या गोष्टींत त्याला लबाडी वाटली नाही. म्हणून रामने शामनी सुचवल्याप्रमाणे वाटणीसाठी मान्यता दिली.

प्रत्यक्षांत काय झालं की, दररोज सकाळ झाली की, भूक लागली म्हणून गाय हंबरायची. मग रामला, बाजारांतून पैसे खर्च




करून, गवत विकत आणून तिला खायला घालावं लागायचं. कारण झाडांचा पाला वरच्या भागांत असायचा, म्हणून त्याला तो घेता यायचा नाही. त्याबरोबरच तिला पाणीही पाजायला लागायचं. सकाळ झाली की, ऊन वाढण्याआधी झाडांच्या बुंध्यांच्या अळयांमध्ये, रोजच विहिरींतून रहाटानी उपसून, पाणी घालावं लागायचं. झाडं चांगली राहावी म्हणून त्याला रोज तो सगळा भाग स्वच्छ झाडावा लागायचा. अशी सगळी अंगमेहनतीची कामं रामला करावी लागायची. म्हणजे इतका खर्च

करून आणि इतकी सगळी कामं करून त्यांतून रामला कांहीसुद्धा मिळायचं नाही. रामला जगण्यासाठी पैसे मिळवण्याकरता लोकांकडे दिवसभर काम करायला जावं लागायचं.

इकडे दिवसभर शाम सगळ्या झाडांवर चढून झाडांची फळं काढून घेऊन जायचा. शाम फळं खायचा आणि उरलेली



बाजारांत, दुकानांत विकून त्याचे पैसे मिळवायचा. तसेच शाम संध्याकाळी गायीचं दूध दोहून चरवीमध्ये भरून घरी घेऊन जायचा. कांही दूध स्वत: प्यायचा. उरलेलं बाजारांत विकून त्याचे पैसे मिळवायचा. याखेरीज शाम गायीचं निघालेलं शेण, गोल आकारांत थापून, त्याच्या वाळलेल्या गोवऱ्या बाजारांत विकून पैसे मिळवायचा. गायीचं दूध आणि झाडाची सगळी फळं शाम घरी घेऊन जायचा. मात्र शाम रामला दूध द्यायचा नाही आणि फळंदेखील रामला मिळायची नाहीत.

म्हणजे रामला कमाई कांहीच नाही. पण रोजच गायीसाठी गवतखरेदीचा खर्च करायला लागायचा. शिवाय झाडाची जागा स्वच्छ ठेवण्यासाठी खूप वेळ झाडझुडीची अंगमेहनत, भरीला विहिरींतून पाणी काढण्याचं श्रमाचं काम अशी वेळखाऊ कामं रामला करावी लागायची. असेच कांही दिवस गेले. मग कांही काळानी रामला जाणीव झाली की, श्यामनी आपल्याला सरासर फसवलं आहे. रामला वाईट वाटलं. पण रामला राग आला नाही. त्यांनी श्यामशी भांडण केलं नाही. पण एक युक्ती शोधून काढली. त्यानी शामला असं सांगितलं की, "मी दररोज इतकी मेहनत करतो, पण मला कांहीच मिळत नाही. म्हणून आता मी माझ्या हिश्श्याचा झाडांचा बुंधा कापून टाकतो आणि गायीचा माझ्या हिश्श्याचा पुढचा अर्धा भाग मी कोणालातरी विकून टाकतो, म्हणजे माझे रोजचे कष्ट तरी वाचतील.

मग शामला जाणवलं की, झाडाचा बुंधा कापला, तर झाडंच राहणार नाहीत. मग झाडांची फळं आपल्याला मिळणार नाहीत आणि गाईचा अर्धा भाग विकला, तरी संपूर्ण गायच आपल्या हातांतून निसटून जाईल. मग दूध कुठून मिळणार? थोडक्यांत आपली लबाडी रामच्या लक्षांत आल्याची जाणीव त्याला झाली. मग आपल्या वागण्याची त्याला लाज वाटायला लागली.

मग शाम रामकडे गेला. त्यानी रामची मनापासून क्षमा मागितली. त्यानी रामला कबूली दिली की, मी आत्तापर्यंत तुला फसवलं. सगळं दूध आणि सगळी फळं मी घेतली. सगळं दूध आणि सगळी फळं विकून, पैसे मी एकट्यानी मिळवले. रामला कमाई तर कांहीच झाली नाही. रामला मात्र गवत खरेदीसाठी पैसे खिशांतून खर्च करावे लागले. रामला फायदा कांहीच मिळाला नाही. उलट रामला जागासफाईसाठी आणि झाडाला पाणी घालण्यासाठी, रोज भरपूर मेहनत करावी लागायची.

शामनी कबूली दिली की, "तुझ्या चांगुलपणाचा फायदा घेऊन मी तुला आत्तापर्यंत फसवलं. आता माझी चूक माझ्या लक्षांत आली आहे. इतके दिवस मला मिळालेल्या पैशातले अर्धे पैसे मी तुला देतो. त्यावर तुझाच हक्क आहे. आजपासून आपण दोघं मिळून सर्व काम करू आणि सगळा खर्च दोघं मिळून करत जाऊ".

मग राम आणि शाम सुखानी एकत्र राहू लागले.

**== XX == XX == XX == XX == XX ==**

# ०२. आगपेटीच्या काडीचा खराखुरा मार

सुरेश ६/७ वर्षं वयाचा असेल. त्याचे आईवडील नित्यनेमानी सायंकाळी जवळच्या तळयापर्यंत फिरायला जात असत. एके दिवशी फिरायला निघतांना, त्याच्या आईनी ४ आणे मनीषला दिले आणि सांगितलं की, २ आगपेट्या आठवणीनी आणून ठेव. आज घरांतल्या सर्व आगपेट्या संपलेल्या आहेत.



संध्याकाळी देवाजवळ दिवा लावायलासुद्धा एखादी काडी शिल्लक नाही. सुरेश हो म्हणाला. पण खेळाच्या नादांत तो आगपेटी आणण्याची गोष्ट तो विसरूनच गेला.

अर्ध्या पाऊण तासांनी आई घरी आली. तोवर अंधार पडलेलाच होता. ती देवाजवळ जाऊन पाहते तो काय? तिथे एकही आगपेटी नव्हती. सुरेश खेळ संपवून घरी आला, तरी आगपेट्या आणायच्या आहेत ही गोष्ट, तो ठार विसरला होता. आईनी त्याला हांक मारून आगपेट्या आणल्यास कां? म्हणून विचारलं, तेंव्हा त्याला आठवण झाली. आता आई आपल्याला रागावणार, या विचारानी तो म्हणाला, अगं आई मी खेळत होतो, म्हणून मी ताईला आगपेट्या आणायला सांगितलं होतं. हे ऐकल्यावर आई कांहीच बोलली नाही. तेवढ्यांत त्यानी ४ आण्याचं नाणं ताईच्या टेबलवरच्या टेबललॅम्पखाली लपवलं. सुरेशनी नाणं लपवलं, ही गोष्ट आईच्या लक्षांत आली नाही. सुरेशला वाटलं, चला आपण सुटलो बाबा यांतून.

थोड्या वेळानी ताई घरी आली, आई सहजच तिला म्हणाली, "मधुरा, विसरलीस नं आगपेट्या आणायला?" मधुरा म्हणाली, "आई, मी ४ वाजताच मैत्रिणीकडे गेले होते अभ्यासाला, ती मी आताच घरी आले आहे. मला तू कांहीच सांगितलं नव्हतंस.

आई म्हणाली, “अगं, मी नव्हतं सांगितलं. मी सुरेशला सांगितलं होतं, त्यांनी तुला सांगितलं, असं तो म्हणाला.”

“अगं आई, माझी सुरेशची दुपारनंतर भेटच झाली नाही. तो कसा मला सांगणार?”

आता आईला खरं काय झालं आहे ते कळलं. ती कांही सुरेशला रागावली नाही. पण थोड्याच वेळात हा गोंधळ बाबांच्या कानावर गेलाच. ते मात्र खूप रागावले. म्हणजे सुरेश आगपेट्या आणायला विसरला म्हणून नव्हे, तर तो खोटं बोलला म्हणून, त्यांना खूप राग आला; आणि आपला मुलगा इतक्या छोट्या गोष्टीकरता खोटं बोलला, याचं त्यांना खूप वाईटही वाटलं. तेसुद्धा सुरेशला कांही बोलले नाहीत. फक्त ते म्हणाले, की माझा मुलगा खोटं बोलतो, म्हणजे आम्हीच त्याच्यावर संस्कार करायला कमी पडलो. त्याला काय रागावणार? आई-बाप म्हणून ही चूक आमचीच आहे. शिक्षा आम्हालाच करायला हवी.

हे त्यांचे शब्द ऐकले मात्र, सुरेशला आपल्या अंगावर वीज कोसळल्यासारखं वाटलं. त्याला आपली चूक कळली होती. त्याला कोणी रागावलं नव्हतं, त्याला वाटलं होतं की, आता आपल्याला मार पडणार. तसा मारही पडला नव्हता. पण त्याला जोरांत रडू आलं. तो आईला जाऊन बिलगला. रडत रडत तो

म्हणाला, आई मी चुकलो. तू मला रागाव, तू मला मार. त्याशिवाय मला बरं वाटणार नाही. आई म्हणाली, "बाळा तुला रागावून काय होणार? उलट तुझी चूक तुला कळली, या गोष्टीचं मला बरं वाटतं आहे".

त्यांचं हे बोलणं ऐकून ताई आपल्या खोलींतून बाहेर आली आणि म्हणाली, सुरेश, तुला आई-बाबा जरी रागावले नाहीत, त्यांनी तुला शिक्षा केली नाही तरी, मी मात्र तुला मार देणार आहे. चांगली काठी घेऊन. तिचं बोलणं ऐकून सगळेच चमकले. आई तिला कांहीतरी म्हणणार होती, तेवढ्यांत ताई पुढे आली आणि कडक आवाजांत म्हणाली सुरेश हात पुढे कर. मी आता तुला चांगला मार देणार आहे. सुरेशनी हात पुढे केला आणि आता जोरांत मार बसणार म्हणून डोळे मिटून घेतले. ताईनी त्याच्या हातावर एक सटका दिला. पण त्याला कांहीच लागलं नाही, म्हणून त्यानी डोळे उघडले आणि तो एकदम खदाखदा हसायलाच लागला. कारण त्याची ताई त्याला आगपेटीच्या काडीनी मार देत होती.

ते पाहून, त्यांतली गंमत कळल्यामुळे, घरांत जे अगदी गंभीर वातावरण झालं होतं, त्याचा आता मागमूसहि राहिला नाही. सगळेच हंसायला लागले. त्यामुळे सुरेशला जरा धीर आला तो

हळूच जाऊन बाबांना बिलगला. बाबांनीही त्याला जवळ घेतलं आणि त्याच्या पाठीवर हात फिरवला.

सुरेश म्हणाला आज या आगपेटीच्या काडीच्या मारानी, मी एक गोष्ट शिकलो. यापुढे मी कधीच खोटं बोलणार नाही. त्याउलट आपल्या हातून चूक झाल्यास ती कबूल करणं आणि ती चूक सुधारणं, हेच योग्य आहे; ही गोष्ट मला आज या आगपेटीच्या काडीच्या मारानी शिकवली.

**== XX == XX == XX == XX == XX ==**

# ३. गाढवापुढे वाचली गीता, कालचाच गोंधळ बरा होता

मुलांनो, तुम्हीहि ही म्हण कधीनाकधी ऐकली असेल. ही म्हण कशी निर्माण झाली, याची एक गमतीदार गोष्ट मी आज तुम्हाला सांगणार आहे. ऐका तर. --

एका गांवात एक धोबी राहात असे. रोज लोकांकडे जाऊन, त्यांचे धुवायचे कपडे गोळा करून आणायचा. नंतर नदीवर जाऊन ते कपडे स्वच्छ धुवायचे आणि मग घरी येऊन त्या कपड्यांना इस्त्री करायची; नंतर घरोघरी जाऊन लोकांचे कपडे पोहोचते करायचे, असा त्याचा दिनक्रम असायचा. त्याकाळी कांही लहान गांवांत नळाद्वारा पाणी घरापर्यंत आलेलं नव्हतं; त्यामुळे नदीवर जाऊनच कपडे धुवायला लागायचे. लोकांना अंघोळीसाठीसुध्दा नदीवर जावं लागायचं. कारण इतक्या लांबून पाणी तरी किती आणि कसं उचलून आणणार? आता हेसुध्दा बघा ना. कपडे आणायचे, नदीवर घेऊन जायचे, उन्हातून घरी आणायचे, परत लोकांकडे पोहोचवायचे. त्याला एकट्याला करावं लागायचं हे सगळं. म्हणून त्यानी भारा वाहण्यासाठी एक गाढव पोसलेलं होतं. त्या गाढवाच्या पाठीवर कपड्यांची गाठोडी ठेवून,

तो त्याचा कपड्यांचा भारा नदीवर नेण्याचं काम जरा हलकं करत असे. त्याचे कपडे धुऊन होईपर्यंत गाढव पाण्यांत आनंदानी डुंबत असायचं. रोजची अशीच पध्दत होती.



एके दिवशी कोण जाणे, गाढव जरा रागांतच होतं. त्यादिवशी त्याला घरी परतायचंच नव्हतं. खूप ऊन तापलं होतं त्यादिवशी, म्हणून ते पाण्यांत डुंबलेलं, घरी परतायला तयारच होत नव्हतं. पण असं लहरीनी वागून कसं चालणार? वेळच्यावेळी घरी तर परतायलाच हवं, नंतर इस्त्रीचं काम करायचं होतं. मग धोब्याने गाढवाला चांगले २-४ रट्टे दिले. गाढवाला राग आलाच होता.

चालता चालता ते उगाचच दुगाण्या (म्हणजे गाढवाचे मागचे २ पाय बरं का) झाडतच होतं. एकदा त्याने इतक्या जोरांत पाय झाडले की, गाठोडीच खाली पडली. सगळे कपडे माती लागून खराब झाले. धोब्याला पुन्हा नदीवर जाऊन कपडे धुवावे लागले. अगदी वैताग आला त्याला. पण करतो काय बिचारा. कपडे पुन्हा धुवावेच लागले. त्यादिवशी घरी परतायला उशीर झाला. मग जेवायला उशीर, पुढच्या कामांना उशीर. रात्री विश्रांतीसाठी झोपायला उशीर. सगळा उशीरच उशीर. पण करतो काय? सगळं त्याला निस्तरावं लागलं.



दुसऱ्या दिवशी सकाळी नेहमीसारखे दोघंही बाहेर पडले. त्याने गाढवाला थोपटलं, चुचकारलं. शेवटी त्या गाढवामुळेच तर त्याचा व्यवसाय नीट चालला होता. ठीक आहे. एखाद्या दिवशी

होतं कांहीतरी; म्हणून काय सारखं रागावून बसायचं? असं कसं चालणार? जाता जाता, त्याने गाढवाला हिरवा चारा खायला दिला. मग तो गाढवाशी बोलायला लागला. म्हणाला, "राजा, मी तुझ्यावर काल उगाच रागावलो. खरंच काल किती ऊन होतं? तुला बसू दिलं असतं, अजून जरा वेळ पाण्यांत तर काय आकाश कोसळणार होतं. चुकलं रे माझं. पण राजा, असं करू नये. कपडे पाडू नयेत असे मातींत. मग आपल्यालाच त्रास होतो नं! शहाण्यासारखं वागावं रे. पुन्हा नाही ना असं करणार? मी पण माझ्या राजाला पुन्हा कधी मारणार नाही. सोन्या माझा. अरे बाबा, तुझ्या मदतीमुळेच तर माझा व्यवसाय चांगला चालतो. मी इतकं जास्त काम करू शकतो. चार पैसे अधिकचे मिळवू शकतो."

असं बोलत तो धोबी, सारखा गाढवाची पाठ थोपटत होता. गाढवालाही बरं वाटत होतं. बोलता बोलता, ते नदीवर पोहोचलेसुध्दा. धोब्यानी गाढवाच्या पाठीवरची गाठोडी खाली उतरवली. त्याने गाठोडी सोडली. आता तो कपडे वेगवेगळे करून पाण्यांत भिजवणार, तेवढ्यांत धोब्याच्या मित्रानी हाक मारली. म्हणून धोबी तिकडे गेला. ते दोघे बोलत होते.

धोब्याच्या गोड बोलण्यामुळे, गाढव फारच खूष झालं. त्याला वाटलं, आपला मालक किती चांगला आहे. काल

आपलंच चुकलं. तो घरी चल म्हणाला, तर आपण पाण्यांतच खेळत बसलो. मग त्याला सगळयाच कामांना उशीर झाला. यापुढे आपण अगदी शहाण्यासारखं वागायचं. त्याला कध्धी त्रास द्यायचा नाही. जेवढी जमेल तेवढी मदत करायची आपण. असं मनाशी ठरवल्यावर गाढवाला अगदी हलकं आणि समाधानी वाटायला लागलं.

उत्साहाच्या भरांत गाढवाला वाटलं की, आपण मालकाला मदत करायला आजपासूनच सुरूवात करावी. म्हणजे मालक आपल्याला शाबासकी देईल. आपण आज कपडे धुवायला मालकाला मदत करावी. मालक परत येईपर्यंत आपण निदान कपडे तरी भिजवून ठेवावेत. म्हणून गाढवानी सगळे कपडे पाण्यांत भिजवले आणि तो कपडे स्वच्छ करण्याच्या उद्देशानी कपड्यांवर नाचायला लागला. त्याच्या नाचण्यामुळे नदींतला तळाचा गाळ ढवळल्या गेला. सगळे कपडे त्या चिख्खलमातीचे डाग-धब्बे पडून खराब झाले. कांही कपडे रंग जाणारे होते, त्यांचा रंग इतर सगळ्या कपड्यांना लागला. गाढवाच्या वजनानी कांही कपडे फाटून गेले.

गाढव कां नाचायला लागलं? ते पाहायला धोबी धावतच परत आला. सगळे कपडे पाण्यांत, त्यावर नदींतला गाळ, हे बघून

धोबी सुन्न झाला. त्यानी गाढवाला २-४ तडाखे हाणले. आपण तर मालकाला मदत केली, तरी मालक आपल्याला कां मारतो आहे? हे गाढवाला उमजेना. मालक आपल्याला उगीचच मारतो आहे, अशा विचारानी  रागावून, ते जोरजोरांत खिंकाळायला लागलं. त्यामुळे मालकाच्या रागांत आणखीनच भर पडली. त्यानी त्याला आणखी २-४ फटके मारले.

आता मात्र गाढवाला मनापासून वाईट वाटलं. ते एकदम गुपचूप बसलं. धोबी म्हणाला, “हाय रे कर्मा, गाढवाशी गोड बोलून कांहीच उपयोग झाला नाही.  गाढवानी माझं फारच नुकसान केलं. आता रंग गेलेले, रंग लागलेले, कांही फाटलेले कपडे वाया जाणार. मला लोकांचे ते कपडे त्यांना बदली नवीन आणून द्यावे लागणार. त्याला वाटलं, “गाढवापुढे वाचली गीता, कालचाच गोंधळ बरा होता”. कारण काल कपडे पुन्हा धुवून स्वच्छ करता आले, पण आज जे नुकसान झालं, ते मात्र भरून न येण्यासारखं  होतं.

**== XX == XX == XX == XX == XX ==**

# ४.गोष्ट सदाची

शेवटी सदाला शहाणपण आलं !

एक होतं गांव. त्या गांवाबाहेरच्या रानांत खूप मधमाशा असायच्या. मधमाशा मध गोळा करून सततच सगळ्या झाडांवर मधाची पोवळी तयार करायच्या. कुठेही पहा, मधाचं पोवळं दिसलं नाही, असं व्हायचंच नाही. जिकडेतिकडे झाडांवर मधाची पोवळी लटकत असायची. मग हळुहळू सगळे लोक त्या गांवाला मधुबनी म्हणायला लागले. त्या गांवाचं नांवच "मधुबनी" म्हणून प्रचलित झालं.

त्या गांवात हनुमंतराव म्हणून एक प्रतिष्ठित गृहस्थ राहत असत. ते फार श्रीमंत नव्हते, पण खाऊन-पिऊन सुखी होते. घरंदाज होते. गांवात त्यांना फार मान होता. त्यांच्या बायकोचं नाव होतं द्वारकाबाई. द्वारकाबाई सुध्दा अगदी हनुमंतरावांना शोभेशाच होत्या. गांवांतल्या लोकांच्या मदतीकरता दोघांचाही हात सदैव पुढे असायचा. त्यांना दोन मुलं होती. मुलीचं नाव होतं सुमन. नांवाप्रमाणेच 'सु'मन, मनानी फार कोमल होती. ती कधी आईवडिलांच्या शब्दाबाहेर जात नसे. त्यांतच तिला आनंद

वाटायचा. त्यांच्या मुलाचं नाव होतं सदाशिव. सदाशिवही चांगला होता. पण तो फारच आळशी होता. हल्ली हनुमंतरावांना फक्त एकच चिंता होती. ती म्हणजे, “आळस सोडून सदाशिव कधी जबाबदारीने वागायला लागणार”?

एके दिवशी त्या सगळ्याच कुटुंबियांना एकत्रितरीतीनी कुठेतरी बाहेर जायचं होतं. हनुमंतराव, द्वारकाबाई व कु. सुमन सकाळीच उठले. आपापलं आवरता आवरता, ते तिघंहि अधूनमधून सदाशिवला उठण्या-आवरण्यासाठी हांक मारीत होते. पण सदाशिव आपला ढिम्मच. एवढ्या हाका ऐकूनदेखील त्यानी कूससुध्दा बदलली नाही. शेवटी ते नाइलाजानी, त्याला सोबत न घेताच बाहेर पडले. सदाशिव उठलाच नाही. ते बाहेर गेल्यावर थोड्या वेळानी सदाशिवनी डोळे उघडले. आई-बाबा घरांत नाहीत, याची खात्री करून घेतली. मग तो हळूच उठला. तोंड धुतलं नाही, दात घासले नाहीत. तसाच स्वयंपाघरांत गेला आणि चहा प्यायला. त्याची आई त्याला नेहमी सांगायची “बाळा-सदाशिव, अरे, लहान मुलांनी चहा पिऊ नये. आपल्याकडे दूध भरपूर असतं. दूध प्यावं. पण सदाशिव कसला आईच ऐकतोय”! त्याचे आपले पहिले पाढे पंचावन्न. (पहिले पाढे पंचावन्न=म्हणजे पालथ्या घड्यावर पाणी,-परिणामशून्य). चहा प्यायल्यावर तो बाहेर आला. आता तरी त्याला उत्साह वाटावा नं! पण छे!

त्याला वाटलं, आता आपल्याला त्रास द्यायला घरांत कोणीच नाही. आपण आता पुन्हा झोप काढू या. तो आंतल्या खोलींत आला आणि गादीवर लोळला. त्याला झोप सुध्दा येईना. तो तसाच पडून राहिला. नकळतच त्याला कधीतरी झोप लागली.



पण हे काय? त्याला त्याचा वर्ग दिसायला लागला. शिक्षक शिकवत होते, मुलं अभ्यास करत होती. आपण झोपलेले असल्यामुळे आपण अभ्यासाच्या कचाट्यांतून सुटलो, याचा सदाला फार आनंद झाला. नसती कटकट अभ्यासाची. सगळी मुलं अभ्यास करताहेत, आपण मात्र आता चेंडू खेळू या. असा विचार करून तो कपाटापाशी गेला. त्याला चेंडू दिसला. पण त्याने चेंडू घ्यायला हात पुढे केला की, त्याच्या हाताला मुंग्या चावल्यासारखं वाटायचं. मग त्याचा हात मागे यायचा. पाहिलं तर हातावर मुंग्या वगैरे कांही दिसायच्या नाहीत. पुन्हा हात पुढे केला की, पुन्हा

हाताला मुंग्या चावताहेत आहेत, असं वाटायचं. पुन्हा हात मागे घ्यावा लागायचा. असं वारंवार काय आणि कां आणि कसं होतंय, हे त्याला उमगेना. मग त्याला वाटलं जाऊ दे, आपण आता चित्रं काढावीत.

पुन्हा तेच. कागद, पेन्सिल, रंगपेटी घ्यायला जावं, तर हाताला मुंग्या चावल्यासारखं वाटायचं. जाऊ दे! कांहीच नको मला. मी आता कांहीतरी खातो. म्हणून तो स्वयंपाकघरांत गेला. इथेही तेच. कांही खाद्यवस्तू घ्यायला गेला की, हाताला मुंग्या यायच्या. हात बाजुला केला की, मुंग्या नाहीत नि कांहीच नाही. तो अगदी कंटाळून गेला. जाऊ दे. आता अंघोळ करूया, म्हणून तो बाथरूममध्ये गेला. आंत पाय टाकल्या क्षणीच तो पाय घसरून खाली पडला. फारसं लागलं नाही. पण पाठींत जरा उसण भरली. त्याला झटकन उठताही येईना. आता त्याला आईची मनापासून आठवण आली. त्याला वाटलं की, आत्ता आई असती, तर तिनी आपल्याला नक्की उठवलं असतं.

पण आता काय करायचं? आई तर नाही घरांत. ती केंव्हा येईल माहित देखील नाही. मग तो कसाबसा उठला. आपल्या खोलींत गेला. त्याने विचार केला, आता कांहीच नको. आता बाबांनी २-३ दिवसांपूर्वी आणून दिलेलं नवीन पुस्तकच वाचू या.

तो कपाटाजवळ गेला. त्याला शंका वाटली की, आपल्याला पुस्तक तरी घेता येईल की नाही? की, हाताला पुन्हा मुंग्या येतील? पण तसं कांही झालं नाही. त्याने हात पुढे केला, पुस्तक उचललं. तो कपाट बंद करणार तोच पुस्तक त्याच्या हातातून खाली पडलं. पाठीत उसण भरलेली होती, म्हणून त्याला वाकून पुस्तक उचलताही येईना? आता मात्र तो खरंच वैतागला. त्याला रडायलाही यायला लागलं. सगळं असं कां होतं आहे, हे त्याला कळेना. तो बावचळला.

तो जोरांत ओरडला, "कोणी मला सांगेल कां की, हे काय चाललं आहे? मला कांहीच कां करता येत नाहीय"? तशी त्याला एक आवाज ऐकू आला. तो कोणाचा आवाज आहे हे त्याला उलगडेना. तो आवाज त्याच्या कपाटांतूनच येत होता. तो म्हणत होता, "सदाशिव, आम्ही कोणीच यापुढे तुझ्याशी सहकार्य करणार नाही. तू आमच्याशी फार वाईट वागतोस. आता सदाशिवला खूपच राग आला. "मी काय वाईट वागतो, हे मला कोणी सांगेल कां"? सदाशिव म्हणाला. तो आवाज पुढे बोलला की, "तू आम्हाला घेऊन वाटेल तिथे टाकतोस, नीट ठेवत नाहीस. त्यामुळे आमची पानं दुमडतात. त्याचा आम्हाला त्रास होतो. हे बहुधा त्याचं पुस्तक बोलत होतं. मग एक जाडजूड आवाज आला. आमची पण स्थिती तीच आहे. आम्हाला तू कुठेही टाकून देतोस.

आमची पानं टराटरा फाडतोस. आता आम्ही इथेच कपाटांत बसून राहणार; त्याची पुस्तकं बोलत होती. एवढ्यांत एक किनरा आवाज आला. “तू तर माझी मानच मोडून टाकतोस. आणि विनाकारण मला छिलून छिलून लहान करून टाकतोस. मग भरीला लहान पेन्सिल नको, म्हणून तिरस्कारानी कचरापेटीत फेकून देतोस.”

सदाशिवला तर कांही आठवेना की, आपण असं कुठे वागतो. तो म्हणाला “असं वागतो मी? छे! शक्यच नाही. “त्यावर धडाधड दोन, तीन वह्या पुस्तकं खाली पडली. ती ओरडायला लागली. बघ, बघ आमची अवस्था काय झाली आहे ते”! सदा म्हणाला, “छेऽ छेऽ, मी नाही केलं कांहीऽऽ”. ती पुस्तकं खदाखदा हसायला लागली. ती म्हणाली, “बरोबर आहे, तू नाही केलंस, तुझ्या आई-बाबांनी, तुझ्या चुकीच्या वर्तनाकडे दुर्लक्ष केलं”. आता मात्र सदा खजील झाला. आपल्यामुळे आईबाबांना वाईटपणा आला, असं त्याला वाटलं. त्याची मान लाजेनी खाली झुकली.

मुळांत सदाशिव कांही इतका वाईट मुलगा नव्हता. सगळ्या माणसांच्यात बरेच चांगले गुण असतात, कांही वाईट गुण असतात. सदा जरा बहकला होता इतकंच! लहान मुलांना कधी

कधी “काय चांगलं, नि काय वाईट”? समजत नाही. सदालाही ते समजलं नव्हतं. पण आता सदाला आपली चूक कळली होती.

एवढ्यात एक पांढरा सदरा खाली पडला. त्याच्यावर शाईचे खूप डाग पडले होते. तो सदरा कांही बोलायच्या आतच सदा त्याला म्हणाला, ”थांब. थांब. कांही बोलू नकोस. आता मला कळलं आहे, चांगलं वागायचं म्हणजे काय ते”. मग मात्र तो सदरा कांही बोलला नाही.



आता सदा थांबला नाही. त्याने लगेचच कपाट आवरायला घेतलं. सगळ्या पुस्तकांची

दुमडलेली पानं सारखी केली. प्रत्येक विषयाप्रमाणे पुस्तकं-वह्या लावली. पुस्तकांना आवरणं घातली. पुस्तकांची नांवं

सुबकरीतीनी लिहिली. कपड्यांच्या नीट घड्या केल्या. कपाट ठाकठीक लावलं; आणि तो "हे मी सगळं केलं", असं सांगायला, धावतच आईकडे निघाला. धावता धावता दारावर डोकं आपटलं. तो कळवळला. त्याचा हात आपसूकच कपाळावरच्या टेंगळाकडे गेला. तेवढ्यांत त्याला जाग आली. अरेच्या? म्हणजे मला स्वप्न पडलं होतं तर. पण आता माझं कुठे चुकतंय, हे सगळं मला समजलं आहे. आजपासून मी सगळ्या गोष्टी व्यवस्थित करणार. तो लगेचच आन्हिकं आवरायला पळाला. त्याने अंघोळसुध्दा नेहमीपेक्षा लवकर केली. तो टेबलापाशी येऊन बसला. तोपर्यंत त्याचे आईबाबा बाहेर जाऊन घरी परतलेले होते. आईला म्हणाला, "आई, मला दूध देतेस का? सदाशिवचा टवटवीत चेहरा बघून, तिला आश्चर्याचा धक्काच बसला. अचंब्यानी दुधाचा कप तिच्या हातांतून खाली पडणारच होता. पण तिनी स्वतःला सावरलं. आई कांही बोलायच्या आताच, सदा म्हणाला, "आई मी तुझा लाडका शहाणा मुलगा आहें नं! आता मी पुन्हा कधी चुकीचं वागणार नाहीय". त्याचं बोलणं ऐकून आईनी त्याला आनंदानी कुशींत घेतलं. उशीरा कां होईना, सदाला आपणहून सुबुध्दी झाली.

**== XX == XX == XX == XX == XX ==**

# ५. जो दुसऱ्यावरी विसंबला त्याचा कार्यभाग बुडाला

परेश चौथ्या वर्गांत शिकत होता. हुशार होता. स्कॉलरशिपच्या परिक्षेला बसला होता. वर्गांत इतरांना जी गणितं जमायची नाहीत, ती परेश चुटकीसरशी सोडवून दाखवायचा. बाई त्याला "हुकमाचा एक्का" म्हणायच्या. त्यामुळे आपल्या हातून



एकही चूक होऊ नये म्हणून तो सदैव जागरूक असायचा. पण तरीही एकदा एक गंमत झाली. गणित बरोबर सोडवूनसुद्धा, त्याला चूक पदरांत घ्यावी लागली.

ऐका नं आता ती गंमत. चौथीचा गणिताचा तास सुरू होता. बाईंनी एक अवघड गणित मुलांना घातलं होतं. मुलं ते गणित सोडवण्याचा प्रयत्न करत होती. परेशनी ते गणित केव्हांच सोडवलं होतं. ते घेऊन तो सगळ्यांत आधी बाईंजवळ पोहोचला होता. बाईंनी त्याची वही बघितली. गणित बरोबरच असणार होतं. तसं ते बरोबरच होतं. बाईंनी कौतुकानी त्याच्या पाठीवर थोपटल्यासारखं केलं आणि त्याला पुढचं गणित सोडवायला सांगितलं. परेश आपल्या जागेवर जाऊन बसला.

वर्गांत परेश हा कांही एकटाच हुशार मुलगा नव्हता. वासंतीदेखील गणितांत हुशार होती. पण तरीही परेश तिच्याहून जरा वरचढ होताच. त्यामुळे वासंती परेशवर जरा खार खाऊन असायची. बाईंना तिचंही कौतुक होतं. पण बाईंनी परेशचं कौतुक केलेलं तिला आवडत नसे. परेशच्या पाठोपाठ तीहि गणित सोडवून बाईंकडे गेली. तिचंही गणिताचं उत्तर बरोबर होतं. बाईंनी तिला शाबासकी दिली. आणि तिलाही पुढचं गणित करायला सांगितलं. ती पळतच आपल्या जागेवर जाऊन बसली. तिला परेशच्या आधी हे गणित सोडवून बाईंकडे जायचं होतं.

गणिताची रीत जरा कठीण होती. गणित २-३ पायऱ्यांमध्ये (टप्पे) सोडवायचं होतं. मजा म्हणजे ते गणित सोडवून वासंती

आणि परेश दोघंही एकाचवेळी बाईंकडे पोहोचली. बाईंनी वासंतीची वही आधी तपासायला घेतली. परेश जवळच उभा होता. त्यानी अभावितपणे वासंतीला विचारलं, “उत्तर किती आलं”? न जाणो आपलं गणित चुकलं असलं तर! वासंतीकरता ही चांगलीच नामी संधी होती. तिला माहित होतं की, “आपलं गणिताचं उत्तर बरोबरच आहे. पण परेशला आपण कां आयतं उत्तर सांगायचं”? म्हणून तिनी त्याला गणिताचं उत्तर ‘५’ आलं असं सांगितलं.

गणिताचं खरं बरोबर उत्तर ‘६’ होतं. परेशनी ते गणित बरोबरच सोडवलं होतं. “६” उत्तर लिहिलेलं होतं. पण वासंतीनी ‘५’ उत्तर सांगितल्यामुळे, त्याच्या मनांत संभ्रम निर्माण झाला. आपलं गणित चुकलं की काय? असं त्याला वाटलं. म्हणून त्यांनी त्याच्या ‘६’ या उत्तराशेजारीच ‘५‘ हा आंकडा लिहिला. एका क्षणार्धांत ही गोष्ट घडली. बाईनी बरोबरची खूण करून वासंतीची वही परत केली आणि परेशची वही हातांत घेतली. परेशनी आपल्या वहीत ‘५’ उत्तर लिहिलेलं वासंतींनी पाहिलं होतं. आता त्याची कशी फजिती होते, हे बघायला ती तिथेच घुटमळत उभी राहिली. बाई त्याला चूक म्हणणार, ह्याची तिला खात्री होती, म्हणून ती जागेवर जाऊन बसली नाही.

बाईंना ह्या कशाचीच कल्पना आली नाही. त्यांनी परेशची वही घेतली. तिथे लिहिलेले आधी ६ व त्याच्या पुढे लिहिलेले ५ हे उत्तर पाहून गणितावर काट मारून परेशची वही परत केली. बाईंनी परेशला चूक म्हटल्यामुळे वासंतीला फार आनंद झाला. तिनी परेशला वेडावून दाखवलं आणि ती समाधानानी जागेवर जाऊन बसली.

आपलं गणित चुकल्याचं पाहून, परेशला धक्काच बसला. तो बाईंना म्हणाला, "काय चुकलं माझं?" बाई म्हणाल्या, "तू दोन उत्तरं काढली आहेस. कुठलं बरोबर आहे?"

वासंतीवर विश्वास ठेऊन, परेश म्हणाला, "५". बाई म्हणाल्या, "मग तर तुझं गणित चुकलेलंच आहे. गणिताचं उत्तर ६ आहे." आता परेश गडबडला. तो म्हणाला, "बाई, माझं उत्तर ६ च आलं आहे. मी ६ च लिहिलेलं आहे."

बाईंनी विचारलं की, "मग तू बाजूला ५ कां लिहिलं आहेस"? त्यावर परेश सरळपणानी म्हणाला, "बाई, वासंतीनी सांगितलं." आता सगळा प्रकार बाईंच्या लक्षात आला. वासंती इथे कां घुटमळत होती, तेदेखील आता त्यांना कळलं. त्यांना हसायला आलं. बाईंना, वासंती आणि परेश यांच्यात असलेल्या चढाओढीची कल्पना होती. वासंतींनी छान डाव साधला होता.

पण मुळांत चूक परेशचीच होती. त्यानी आधी तिला "उत्तर किती आलं?" असं कां विचारावं, आणि मग डोळे मिटून तिच्यावर विश्वास कां ठेवावा?

बाई त्याला म्हणाल्या, "जो दुसऱ्यावरी विसंबला त्याचा कार्यभाग बुडाला". हे ऐकून परेश अगदी खजील झाला. आपण अकारण वासंतीवर विश्वास ठेवला, असं त्याला वाटलं. पण आता त्याचा काय उपयोग होता? परेशची व्हायची ती फजिती होऊनच गेली होती. आता आपण कधीच दुसऱ्याचं ऐकून, त्यावर डोळे मिटून, विश्वास ठेवायचा नाही, असा त्यानी आपल्या मनाशी निश्चय केला.

**== XX == XX == XX == XX == XX ==**

# ६. थेंबभर पाणी

ललितला पाण्यांत खेळायला फार आवडायचं. लहानपणी तर तो समोर पाणी ठेवलं की, त्यांतच रमून जायचा. मग इतर कांही खेळ त्याला लागायचे नाहीत. तो मोठा झाला तरी त्याची ही आवड कमी झाली नाही. म्हणून मग त्याच्या आईनी ठरवलं की, त्याला पोहायला शिकवायचं. ललित पोहायला जाऊ लागला. स्वच्छता आणि सावधगिरी म्हणून टॅंकवरच्या पाण्यांत क्लोरीन टाकलेलं असतं. त्यामुळे पोहणं झाल्यावर पुन्हा अंघोळ करावी लागते. त्याप्रमाणे तो घरी आल्यावर अंघोळ करायचा. आईनी त्याला सांगितलं होतं की, “तू पोहून आलेला असतोस, म्हणून जास्तवेळ पाण्यांत खेळायची गरज नाही. २ मिनिटं शॉवरखाली उभं राहायचं आणि बाहेर यायचं”. पण ललित आईच्या बोलण्याकडे मुळीच लक्ष द्यायचा नाही. अर्धा तास पाण्यांत खेळत राहायचा. आई रागवायची, ‘पण हूँ ! आईकडे कोण लक्ष देतं ! आईला ओरडायची सवयच आहे’, अशी त्याची वृत्ती.

कधी कधी बाबासुद्धा त्याला समजवायचे. पण बाबांना नेहमी कुठून असणार एवढा वेळ? ते सदैव त्यांच्या कामांत बुडालेले. दादा कधी बोलला, तर ललित कांगावा करायचा; मग आजी ललितची बाजू घेऊन दादावरच डाफरणार, हे ललितला



माहित असायचं, नि घडायचंही तसंच. कारण ललित घरांत सर्वांत लहान होता नं ! त्यामुळे ललित अगदी शेफारला होता. त्याला पाण्याचं महत्व कसं समजावून द्यावं, हा आईपुढे एक मोठाच प्रश्न होता.

एकदा ललित त्याच्या मावशीच्या गांवी गेला होता. मावशीचं गांव लहानसं होतं. तिथे त्यांची शेती होती. शेतांत एक भलीमोठी विहीरदेखील होती. एक दिवस ललित त्याच्या मावशीच्या यजमानांबरोबर शेतांत गेला होता. त्यानी ती मोठ्ठी विहीर पहिली. त्याला वाटलं आपण या विहिरींत पोहावं. तो म्हणाला, "काका मी विहिरीत पोहू कां? मला येतं पोहायला." काका म्हणाले, "अरे हल्ली पाणीच नसतं विहिरीत. पूर्वी आम्ही पोहायचो विहिरीत. पण आता विहिरीत पोहण्याइतकं पाणीच नाही. सगळीकडे बोअरवेल खोदल्यामुळे विहिरीच्या पाण्याची पातळी कमी झालेली आहे. ललितला कांही फारसं कळलं नाही. पण तो जरासा नाराज झाला. त्याला आपण किती छान पोहतो, ते काकांना दाखवावंसं वाटत होत. पाणी कमी झालं म्हणजे काय? कशामुळे? असा विचार करतच तो काकांबरोबर घरी आला. घरी येईपर्यंत संध्याकाळ होत आली होती. त्यामुळे ते घरी परतेपर्यंत जेवायची सगळी तयारी झाली होती. तोही जेवला आणि झोपी गेला.

झोपेंत बहुधा त्याला स्वप्न पडलं असावं. “ओहो, तो एका नदींत पोहत होता. एक मासाही सारखा त्याच्या बरोबर पुढे पुढे चालला होता. चांगला मोठा मासा होता तो. तरीही ललित अजिबात घाबरला नव्हता. उलट तो मधून मधून माश्याला हात लावत होता. माशाचं अंग सुळसुळीत आणि गारीगार लागत होतं हाताला. तो मासाही ललितला भ्यायला नाही. त्या माशाच्या नादांत आपण किती दूर आलो आहोत, ललितला भानच राहिलं नाही.



जेंव्हा त्याच्या लक्षांत आलं की, पोहत पोहत आपण फारच दूरवर आलो आहोत. तेंव्हा तो मागे वळला. आता परतीचं पोहायला सुरवात करणार तोच त्याला कोणाचं तरी बोलणं ऐकू

आलं. कोण बोलतं आहे? इथे तर आपल्याशिवाय कोणीच नाही. हा मासा बोलला की काय? हो. खरोखरच तो मासाच बोलत होता. तो ललितला म्हणत होता की, ‘इतक्या दूर आला आहेस, तर माझ्या घरी तरी चल थोडावेळ.’

ललितला गंमतच वाटली. आपल्याशी मासा बोलला, या विचारानीच ललित खूष झाला होता. तो म्हणाला, “चल, येतो मी थोडावेळ. पण अगदी थोडाच वेळ हं! घरी आई माझी वाट बघत असेल. एवढं बोलेस्तोवर माशाचं घर आलं सुद्धा. माशाचं घर खाली खोल पाण्यांत होतं. माशांनी काय जादू केली, ललितला कळलंच नाही. खोल पाण्यांत जाऊनसुद्धा ललितला श्वास घ्यायला कांहीच त्रास झाला नाही. तिथे बरेच मासे होते. निरनिराळ्या प्रकारचे मासे पाहून ललितला खूप मजा वाटली. सगळे मासे चक्क त्याच्याशी बोलत होते. ललित त्यांना नाना प्रश्न विचारत होता. पाण्याखालच्या अद्भूत जगाची माहिती ऐकून तो अगदी चक्रावूनच गेला. किती वेळ गेला त्याला कळलंच नाही.

ते मासेही त्याला कांहीबाही प्रश्न विचारत होते. त्यांनाही जमिनीवरच्या जगाची माहिती हवी होती. बोलता बोलता ललित त्यांना आपल्या घराबद्दल माहिती सांगू लागला. तेंव्हा एकदम त्याच्या लक्षांत आलं की, आता आपल्यालाही घरी गेलं पाहिजे.

तो म्हणाला, "चला आता मला जायला हवं. आपण उद्या पुन्हा भेटू." ललितनी जायचं नाव काढल्याबरोबर माशांनी त्याला शंख-शिंपले आणि इतर अनेक गोष्टी आणून दिल्या. तो समुद्री खजिना पाहून ललित अगदी हरखूनच गेला. शेवटी एका माशानी त्याला एक शिंपल्याची पेटी आणून दिली आणि तो म्हणाला, " ललित या शिंपल्यात मोठा मोती आहे. तू घरी गेलास की, आमची आठवण म्हणून त्या मोत्याची अंगठी करून घाल बोटांत."

ललित त्यांना म्हणाला, "एवढ्यांत आठवण वगैरे काय आहे? आपण तर रोज भेटणार आहोत." तेंव्हा मासे म्हणाले, "आम्ही आजच ही जागा सोडून दुसरीकडे जाणार आहोत."

ललित म्हणाला, "कां बरं? ही जागा तर चांगली आहे." तेंव्हा ते मासे म्हणाले, "आत्ता ठीक आहे रे; पण थोड्याच दिवसांत ही नदी सुकून जाईल. तिच्यांत पाऊलभरसुद्धा पाणी राहणार नाही. मग आम्हाला कसं राहता येईल इथे? आम्हाला ही जागा सोडूनच जावं लागेल."

ललित अगदी खट्टू झाला. त्याला ते मासे खूपच आवडले होते. तो म्हणाला, "पाणी कां कमी होईल बरं?" तेंव्हा ते मासे म्हणाले, "अरे या नदीवर बघ नं किती धरणं बांधलेली आहेत. हे लोक सगळं पाणी अडवून ठेवतात. पावसाळा येईपर्यंत नदी अगदी

टक्क कोरडी होऊन जाते. दरच वर्षी आम्हाला असं निघून जावं लागतं. पण आता आम्हाला वारंवार जाण्याचा कंटाळा आला आहे, म्हणून आम्ही आता ही जागा कायमच सोडून जाणार आहोत.''

त्यांचं बोलणं ऐकून ललित गोंधळला. तो म्हणाला, ''ही धरणं बांधणं आवश्यकच आहे, त्यामुळे शेतीला पाणी मिळतं; पावसावर अवलंबून राहावं लागत नाही''. ''ठीक आहे.'' मासे म्हणाले. ''तुम्ही नळ सारखे चालू ठेवता. नळ पूर्ण सोडल्याशिवाय तुम्हाला कामच करता येत नाही. शिवाय तुम्ही लोक दिवसांतून २-२ वेळा अंघोळ करता त्याचं काय? की तेहि आवश्यकच आहे?'' आता मात्र ललित जरा संकोचला. त्याला आई रोज आपल्याला पाणी कमी वापरत जा, असं सांगते ते आठवलं. आपण मात्र आईच्या सांगण्याकडे अजिबात लक्ष देत नाही हे ही आठवलं. मग तो गुपचूपच बसला.

''माणसं अविचारानी पाणी उधळतात आणि त्याचा त्रास मात्र सर्वांनाच होतो. पाण्यांत राहणाऱ्या आमच्यासारख्या माशांचं तर मरणच ओढवतं. आम्हाला असं, आमचं घर सोडून जायची वेळ आणता तुम्ही माणसं.'' मासे उद्वेगानी म्हणाले. आता मात्र ललित चांगलाच ओशाळला. 'पाणी जपून वापरलं पाहिजे, कारण

ते सर्वांकरता आहे,’ इतकी साधी गोष्ट आपल्या लक्षांत कशी आली नाही.’ याची त्याला आता लाज वाटायला लागली. आपल्यासारख्यांच्या अविवेकी वागण्यामुळे इतका गंभीर आणि दीर्घकालीन परिणाम होत असेल, अशी कल्पनाही ललितला कधी आली नव्हती. आता मात्र त्यांनी मनाशी निश्चय केला की, उद्यापासून आपण पाणी अगदी जपून वापरायचं.

आपला हा नवा निश्चय आईला सांगायला ललितनी आईला जोरांत हांक मारली आणि तो जागा झाला. त्याला वाटलं,की एकदम कुठे गेले सगळे मासे? मग ललितच्या लक्षांत आलं की, “अरेच्चा मला झोपेंत स्वप्न पडलं वाटतं मला. असू दे. पण आता मात्र आपण स्वप्नांत कां होईना, ‘ पाणी बेतानी वापरायचा केलेला निश्चय ’जन्मभर पाळायचा’.

**== XX == XX == XX == XX == XX ==**

## ७. राजकन्येला दाढीमिशा

चुकीच्या वर्तनात बदल करण्याचा फायदा!

एक राजा होता. त्याला दोन जुळ्या मुली होत्या. एकीचं नाव होतं सुवर्णा. सुवर्णा म्हणजे तेजस्वी वर्णाची, सोन्यासारख्या रंग असलेली. तिला आपण राजकन्या आहोत, या गोष्टीचा वृथा गर्व होता. आपण राजकन्या आहोत, म्हणून सगळ्यांनी आपलं ऐकलंच पाहिजे, असं तिला वाटायचं. ती फार हेकेखोर झाली होती.

दुसऱ्या बहिणीचं नांव होतं अपर्णा. ती सुस्वरूप तर होतीच. पण तिला, ती राजकन्या असल्याचा तोरा नव्हता. ती स्वभावाने फार लाघवी आणि दयाळू होती. कोणीही दुःखी असलेलं तिला बघवायचं नाही. खरं तर सगळ्यांनीच सुखी असावं, असं तिला मनःपूर्वक वाटायचं. राजा-राणी दोघींना एकच समान शिकवण देत असत. त्यांचं आपल्या दोन्ही मुलींवर सारखंच प्रेम होतं. ते उभयता, त्या दोघींना सारखंच वागवत. तरीपण त्या दोघींच्या स्वभावांत असलेला फरक त्यांनाही जाणवत असे. ते अनेकदा सुवर्णाला समजवायचे की, "बाळा, असं उध्दटपणानी

वागू नये. देवाला ते आवडत नाही”. पण  ती आपली सदैव गर्विष्ठपणा मिरवायची. आईबाबांनी कितीही सांगू देत, पालथ्या घड्यावर पाणी.



राजवाड्यांत कशाचीच कमतरता नव्हती. राजाही चांगला होता. त्याला प्रजाजनांविषयी प्रेम होतं. सर्वांशी तो अगदी न्यायानी वागत असे. अपर्णा हे सर्व बघत असे. ती हळुहळू राजाच्या पावलावर पाऊल टाकून-सर्व लोकांचा, विचार करायला शिकत होती. त्यामुळे ती राजाची फार आवडती बनली होती. सुवर्णा अन् अपर्णा, दोघीही सर्वांच्याच लाडक्या होत्या. त्या शिकत होत्या.

अभ्यासांतही हुशार होत्या. अपर्णाला बागेंत काम करायला खूप आवडायचं. नवनवीन झाडं-फुलझाडं लावणं, त्यांची मशागत-काळजी-निगराणी-देखरेख करणं, तण काढणं, बागेची स्वच्छता राखणं, तिला फार आवडायचं. इकडे सुवर्णाला सुरेख चित्र काढण्याची देवदत्त देणगी होती. तिनी काढलेली चित्रं इतकी हुबेहूब असायची की, चित्रांतली वस्तू खरी की, प्रत्यक्षांतली खरी? असा पाहणाऱ्याला संभ्रम पडावा.

राजाची बाग सुरेखच होती. माळ्याचं सगळं कुटुंबच त्या बागेंत काम करत असे. मोकळा वेळ मिळाला की, अपर्णाही बागेंत काम करायला जायची. राजकन्या असूनदेखील बागेंत, मातींत हात घालून काम करायला, तिला कधी कमीपणा वाटत नसे. नेहमीच बागेंत काम करत असल्यानी, तिची माळ्याच्या कुटुंबाशी छान गट्टी जमलेली होती. त्या माळ्याला एक "फुलवा" नांवाची लहान मुलगी होती. ती फुलासारखी नाजूक आणि सुरेख होती. अपर्णा नेहमीच तिच्याशी खेळायची. आपल्याकडची खेळणी तिला द्यायची. दोघींचं अगदी छान मेतकूट जमायचं. एक दिवस कुंभाराकडून फुलवासाठी माळ्यानी मातीची खेळणी विकत आणली. ती खेळणी सराईत हातांनी बनवलेली असल्यामुळे खूपच सुंदर दिसत होती. अपर्णा बागेंत काम करायला आली. तेंव्हा तिनी ती खेळणी पहिली.

तिलाही ती खूपच आवडली. अपर्णा आणि फुलवा, कितीतरी वेळ, ती खेळणी घेऊन खेळत होत्या. पण अपर्णाला ती खेळणी आपल्या राजवाड्यांत घेऊन जावी, असं वाटलं नाही.

एक दिवस सुवर्णानी ती खेळणी पहिली. तिलाही खेळणी खूप आवडली. तिला वाटलं की, आपण त्या खेळण्यांची चित्रं काढावीत, म्हणून तिनी फुलवाला ती खेळणी मागितली. फुलवा लहान असल्याकारणानी तिला अजून कांही समज आलेली



नव्हती. ती आपली खेळणी दुसऱ्याला कशी घेऊ देईल बरं? तिला मालक-नोकर, गरीब-श्रीमंत, राजा-प्रजा-बिजा कांही समजत नव्हतं. ती आपली खेळणी आपल्या हातांत घट्ट धरून बसली. सुवर्णाही खेळणी मला हवीच म्हणून, आपला हेका सोडीना.

माळ्याला वाटत होतं की, सुवर्णाताईला फुलवाची खेळणी दिली नाहीत, तर राजेसाहेब रागावतील व आपल्याला कामावरून हाकलून देतील. माळीबुवानी खेळणी सुवर्णाला देऊन टाकण्यासाठी फुलवाला समजावण्याचा खूप प्रयत्न केला. पण फुलवा ऐकेना. शेवटी तो सुवर्णाला म्हणाला की, "सुवर्णाताई, फुलवा झोपली की, मी ती खेळणी तुमच्या राजवाड्यांत आणून देईन. आत्ता ती खेळणी इथेच राहू देत".

माळ्यानी अगदी योग्य सांगितलं होतं. पण सुवर्णाला तो तिचा अपमान वाटला. मी एवढी राजकन्या आणि ही नोकराची चिमुरडी मुलगी-फुलवा माझं ऐकत नाही म्हणजे काय? ती झटक्यांत पुढे गेली आणि ती फुलवाच्या हातातून ती खेळणी हिसकून घेऊ लागली. फुलवानी तिची खेळणी घट्ट धरलेली सहजासहजी सोडेना. दोघींच्या झटापटीत ती मातीची खेळणी खाली पडली आणि फुटून गेली. मग तर फुलवा अधिकच जोरजोरांत रडायला लागली. सुवर्णा जरा खजील झाली. मग कांही न बोलता सुवर्णा आणि अपर्णा राजवाड्यांत परतल्या.

झाल्या घटनेनी माळी मात्र फार घाबरून गेला. माळ्याला वाटलं की, आता आपल्या बागकामाचं कांही खरं नाही. राजेसाहेब आता आपल्याला कामावरून काढून टाकणार. पण तसं कांहीच

घडलं नाही. कारण मुलींनी ही गोष्ट घरी सांगितलीच नाही. मुली ही गोष्ट विसरून देखील गेल्या. फुलवादेखील थोड्या दिवसांनी ही गोष्ट विसरली. पण एका परीनी मात्र ही घटना घडतांना बघितलेली होती. त्या परीला सुवर्णाच्या चुकीच्या वर्तनाचा रागही आला होता.



थोड्या दिवसांनी एक नवीनच समस्या उद्भवली. निमित्त काय झालं ते कुणालाच कळेना! सुवर्णाच्या चेहऱ्यावर, गालांवर केस उगवायला लागले. ती खूप घाबरली. तिला स्वत:च्या रूपाची लाज वाटायला लागली. कोणाकडे कुठे जाता-येता येईना. तिला चांगल्याच दाढी-मिशा आल्या. असं कां होतं आहे? हे कोणालाही कळेना. हा कुठला रोग? हे राजवैद्यालाही समजेना. सगळेच घाबरले. राणीसाहेब तर हाय खाऊन आजारीच

पडल्या. आता सुवर्णाचं कसं होणार? या विचारानी त्यांना झोपही लागेना.

या रोगावर कांही इलाज आहे कां, ते पाहण्यासाठी राजेसाहेबांनी चारी दिशांना दूत पाठवले, पण दूत हात हलवत परत आले. साऱ्या राजवाड्यावर दुःखाचं सावट पसरलं. सगळ्या गांवांत सुवर्णाबद्दल चर्चा सुरू झाली. सुवर्णाच्या स्वभावांतला ताठा पार उतरून गेला. काय करावं, ते कोणालाच कांही कळेना. अपर्णा-नि-सुवर्णा तर जुळ्या बहिणी. मग सुवर्णाला जो त्रास झाला, तो अपर्णाला कां बरं झाला नाही? यावरून लोक नाना तऱ्हेचं बोलायला लागले. बोलायचं थांबवणार तरी कोणाला आणि कसं?

एक प्रकारे, त्या राज्यातलं सगळं जनजीवन ढवळून निघालं होतं. सगळीकडे वातावरणांत उदासीनता आली होती. एक दिवस जणू चमत्कार झाला. राजवाड्यांत एक अगदी सामान्य दिसणारा माणूस, राजाची भेट घ्यायची आहे, असं सांगू लागला. पहारेकरी त्याला राजाकडे घेऊन गेले. राजा म्हणाला, "बोल, तू कशासाठी इथे आला आहेस? तर तो माणूस म्हणाला, मला राजकन्या सुवर्णाशी एकटीशी बोलायचं आहे. राजा म्हणाला, "माझ्यासमोर बोल राजकन्येशी. तिथे तू, मी व राजकन्या तिघंच

असू". पण या अटीला तो माणूस तयार झाला नाही. राजानी रागारागानी त्या माणसाला बंदिवासांत टाकायला सांगितलं. पण मुलांनो, चमत्कार असा झाला की, त्या माणसाला तुरुंगाच्या दाराच्या आंत ठेऊन दार लावलं, अगदी कुलूप घातलं तरी, हा माणूस पुन्हा बाहेरच राजाशेजारी उभा दिसत होता. पहिल्यांदा राजाला वाटलं की, पहारेकऱ्यांची नजरचूक झाली असेल. पण जेंव्हा वारंवार हा प्रकार घडला, तेंव्हा राजाला जाणवलं की, हा कोणीतरी वेगळाच माणूस दिसतो आहे. याच्याशी बोलायलाच हवं. मग राजानी पहारेकरी बाहेर पाठवून दिले. आता दरबारांत राजा आणि तो माणूस दोघंच उरले. तेंव्हा राजानी हात जोडले. राजा म्हणाला, "महाराज, आपल्याला ओळखण्यात माझी चूक झाली. आपण कांहीतरी विशिष्ट उद्देशानी इथे आला आहात. मला क्षमा करा. मी काय करू, ते सांगा?" तो माणूस म्हणाला की, "मला सुवर्णाकडे घेऊन चला. मला तिच्याशी एकटीशी बोलायचं आहे".

आता राजाचा निरुपाय झाला. शेवटी राजांनी विचार केला की, "जे होतं ते भल्याकरताच होतं", असं आपण म्हणतो. आता हा माणूस जर राजकन्येला भेटला, तर त्यांतूनही कांही तरी चांगलंच निष्पन्न होईल. मग राजा त्याला म्हणाला की, "ठीक आहे. तू तिच्याशी एकटीशी बोलू शकतोस. पण ते इथे राजवाड्यांत नाही. बागेंत एका झाडाखाली मी तुमची उभयतांची बसायची सोय करून

देतो, तिथे तू सुवर्णाशी एकटीशी बोलू शकतोस. मग झाडाखाली दोन खुर्च्या ठेवल्या. एका खुर्चीवर त्या माणसाला बसवलं; आणि सुवर्णाला बोलावणं पाठवलं. सुवर्णा आली. मग राजा तिला म्हणाला की, "सुवर्णाss, हे काका तुला भेटायला आलेले आहेत". पण सुवर्णा त्याच्याशी एकट्याशी बोलायला तयार होईना. मग राजांनी सुवर्णाला एका बाजूला बोलावून तिली समजावलं की, "बघ, त्याला एकट्या तुझ्याशीच बोलायचं म्हणतो आहे, त्याला कांहीतरी विशिष्ट कारण असावं. एखादेवेळी तुला त्याचा फायदाही होऊ शकेल. तो तुला कांही करणार नाही. मी स्वतः इथे जवळच जातीनी उभा राहतो आहे. तो माणूस वयस्क आहे. तू त्याच्याजवळ गेलीस की, त्याला वाकून नमस्कार कर आणि मगच खुर्चीवर बैस."

शेवटी नाइलाजास्तव सुवर्णा त्याच्याशी बोलायला तयार झाली. ती त्या माणसाच्या जवळ आली. तिनी त्याला आदरपूर्वक नमस्कार केला. समोरच्या खुर्चीवर बसली. मग अगदी हळू आवाजात तो माणूस सुवर्णाला म्हणाला, "सुवर्णा, घाबरू नकोस. मी इथे तुला मदत करायला आलो आहे". हे ऐकून सुवर्णाला बरं वाटलं. मात्र नकळतच तिनी स्वत:च्या गालाला हात लावला. ती कांही बोलणार, एवढ्यांत तो तिला म्हणाला, "तुला होणारा हा त्रास थांबवायलाच मी इथे आलेलो आहे." जरा डोळे मिटून घे

आणि शांत मनानी आठवण कर की, "तू कोणाशी कधी वाईट वागली, कुणाला वाईट बोललेली आहेस कां?"

सुवर्णा कांही अगदी भावनाशून्य मुलगी नव्हती. त्यानी विचारलेला प्रश्न ऐकून, तिचा चेहरा खर्रकन उतरला. तिच्या नाकाचा शेंडा लालेलाल झाला. कांही काळापूर्वी, फुलवाची खेळणी तिच्या हातून फुटली याचं तिलाही फार वाईट वाटत होतं; पण ती राजकन्या असल्याकारणानी, आपली चूक झाली, हे कबूल करायची तिला लाज वाटत होती. एवढ्यांत त्या माणसांनी पुन्हा तिला विचारलं की, "तू कां बरं रडते आहेस? तुझ्याकडून अशी कांही चुकीची गोष्ट खरंच घडली आहे कां?" मग मात्र तिच्या डोळ्यांतून घळघळा पाणी यायला लागलं. अगदी प्रयत्नपूर्वक तिनी हळुहळू तिच्या हातून फुलवाची खेळणी कशी फुटली, ते सलगरीतीनी त्या माणसाला सांगितलं.

त्यावर तो माणूस म्हणाला, "ठीक आहे. तुला फुलवाची खेळणी आवडली, ती आपल्याला मिळावीत असं तुला वाटलं, तर त्यांत फारसं चुकीचं कांही नाही. लहान मुलांचं मन अगदी असंच असतं. पण जशी तू फुलवाची खेळणी मागितली, तशीच समान न्यायानी, तू तुझी खेळणी तिला कधी कां दिली नाहीस बरं? तू तिची खेळणी घेणार, तर, तू तुझी खेळणी नकोत कां आपणाहून

तिला द्यायला?" आता सुवर्णाला पूर्वी फुलवाशी वागतांना आपलं काय चुकलं ते उमगलं. ती गुपचूपपणे उठली आणि आपली खेळणी घेऊन आली.

त्यावर तो म्हणाला, "जा, आता जाऊन तुझी खेळणी फुलवाला देऊन ये. तिला समजावून सांग की, माझ्या हातून तुझी खेळणी फुटून-तुटून गेली, म्हणून मी माझी ही खेळणी तुला देते आहे". सुवर्णाला आता आपल्या चुकीच्या वागण्याची जाणीव झालेली होती. ती निमूटपणानी उठली, आणि फुलवाकडे जाऊन तिला सुवर्णानी आपली खेळणी देऊ केली.

ते बघून माळीबाबा तर फारच घाबरून गेला. फुलवानी राजकन्येची खेळणी घेतली तर, राजेसाहेब नक्कीच आपल्याला शिक्षा देणार, असं त्याला वाटलं. ते फुलवाला ती खेळणी घेऊ देईनात . तेंव्हा सुवर्णा त्यांना म्हणाली की, "माळीबाबा, घाबरू नका. फुलवाला ही खेळणी घेऊ द्या. माझ्या हातून तिची खेळणी फुटली-तुटली आहेत. म्हणून मी ही खेळणी तिला देते आहे. चूक माझीच होती, हे मला कळलंय." शेवटी माळीबाबांनी फुलवाला ती खेळणी घ्यायला परवानगी दिली.

मग फुलवानी ती खेळणी घेतली. तिला खूपच आनंद झाला. सुवर्णालाही बरं वाटलं. माळीबाबा आपल्या कामाला गेले.

सुवर्णा परत आली तो काय? तिच्याकडे आलेला तो माणूस निघून गेलेला होता. तो असा तडकाफडकी कां आणि कुठे निघून गेला हे सुवर्णाला आणि जवळच असलेल्या राजालादेखील कळलंच नाही. ती राजाकडे गेली. काय आणि कसं घडलं, हे तिनी राजाला सांगितलं. राजालाही ते ऐकून बरं वाटलं. त्यांनी सुवर्णाला शाबासकी दिली. सुवर्णा खूप दिवसांनी आनंदित झाली. कारण आज तिनी एक चांगलं काम केलं होतं. कधी नव्हे, ती आज तिला शांत झोप लागली. तिच्या स्वप्नात एक परी आली. तिनी तिच्या कानांत एक गंमत सांगितली. स्वप्न संपलं. सुवर्णा जागी झाली. तिनी मनाशी एक निश्चय केला की, आजपासून ती कुणाशीही वाईट वागणार नव्हती. वेडा हट्ट करणार नव्हती.

आईला तिनी केलेला, "इत:पर चांगलंच वागण्याचा", निश्चय सांगायचा होता. ती आई जवळ धावतच गेली, तिनी आईला मिठी मारली. ती आता बोलायला सुरवात करणार, तोच आई तिला म्हणाली, "अगं सुवर्णा, तुझा चेहरा पुन्हा पूर्वीसारखा-केसविरहित दिसतो आहे. हे कसं काय झालं गं?" सुवर्णा धावतच आरशासमोर जाऊन उभी राहिली. पाहते तो काय? चेहऱ्यावरच्या सर्व दाढी-मिशा गायब. तिला खूपच आनंद झाला. तिच्या डोळ्यांत आनंदाश्रू उभे राहिले. एकाएकी असं कसं झालं, हे तिला कळेना. ती विचार करत होती, तेवढ्यांत एक आवाज आला.

“चांगल्या वागणुकीचं फळ नेहमी चांगलंच मिळतं.” तिनी एकदम चमकून आजुबाजूला, वर-खाली, मागे-पुढे सगळीकडे शोधलं, पण तिथे कोणीच नव्हतं. सुवर्णाच्या लक्षांत आलं की, हा आवाज काल आपल्याशी बोलायला आलेल्या काकांचाच आवाज आहे.

मग तिच्या लक्षांत आलं की, “आज तिनी फुलवाला आपली खेळणी देऊन, स्वतःच्या चुकीचं परिमार्जन केलं, म्हणजे स्वतःची चूक दुरूस्त केली, त्याचंच हे फळ आहे”. चांगलं वागल्यामुळे तिला आधीच आनंद झाला होता. आता तर तिनी मनाशी निश्चयच करून टाकला की, “आता आपण कधीच कुणाशी वाईट वागायचंच नाही”.

**== XX == XX == XX == XX == XX ==**

# ८. शेंडे बुडखे रेड्काला



तानबा नांवाचा एक लोभी मनुष्य होता. फार कांही कामधंदा करायचा नाही. इकडून तिकडून जे मिळेल ते लाटायचं आणि जीवन कंठायचं असा त्याचा रिवाज होता.

एकदा परक्याच्या शेतांत ऊस कापणीला आलेला त्याला दिसून आला. झालं. तानबाला लोभ निर्माण झाला. तानबानी आपल्या तरूण मुलाला बोलावून आणलं आणि सांगितलं की, “समोरच्या शेतांत जा आणि ऊस कापून आण बरेचच. नंतर त्याचा मुलगा शेतांत गेला, तर तानबा त्याला म्हणाला की,

"दश तुला, दश कारभारणीला, पंच पंच पोरांना, शेंडे बुडखे रेडुकाला. म्हणजे १० माझ्यासाठी, १० तुझ्या आईसाठी, ५-५ तुम्हा दोघा भावंडांसाठी असे १०+१०+५+५=३० ऊस तोडून आण. आपण ऊस खाऊ आणि उरलेले शेंडे बुडखे रेडूकाला (म्हणजे आपल्या म्हशीच्या पिल्लाला खायला) कामी येतील". मुलगा ऊस तोडू लागला. तर विळा ऊंच करून ऊसाच्या मुळावर घाव घालायचा. तर तो कोयता दुरून दिसत होता. तर तानबा त्याला म्हणाला की, "तू कोयता वर केल्यावर तुझी शेंडी हलतांना दिसून येते". म्हणून तानबा म्हणाला की, "शेंडी दिसते खाली बसा."

नंतर मुलानी हळुहळू करत सगळे ऊस तोडून आणले. तानबानी खांद्यावर ऊसाचा भारा बांधून घरी नेला. म्हणजे "हपापाचा माल गपापा"!

<u>तात्पर्य:- मूळ वस्तू अन्य कोणाच्या मालकीची आणि उपभोग घेणारा भलताच.</u>

== XX == XX == XX == XX == XX ==

## ९. भागाबाईचा मळा

### *भोळीभाबडी म्हातारी अन् तिचा विचारी मुलगा-दामू*

एका छोट्याशा गांवांत भागाबाई, तिचा मुलगा दामोदर ऊर्फ दामू, याच्याबरोबर राहत असे. ती अगदी गरीब होती. घरांत खायचीदेखील भ्रांत होती. तरीही कोणी मदत मागितली, तर भागाबाई त्याला कधी नाही म्हणत नसे. तिचा स्वभाव फार कनवाळू, प्रेमळ आणि भोळा होता. खरंतर या तिच्या भोळ्या स्वभावाचा त्रासच व्हायचा. कारण घरांत पैसे कमावणारं कोणीच नव्हतं. त्यामुळे पैशांची सदैव चणचण असायची. त्यांत कोणी कांही मागायला आलं की, भागाबाई जे असेल-नसेल ते मागणाऱ्याला देऊन टाकायची. मग कधीकधी घरांत कांहीच उरायचं नाही. माय-लेकराला उपास घडायचा. पण भागाबाई कधी कोणाकडे कांही याचना करायला गेली नाही. ती फार स्वाभिमानी होती.

दामूही तसाच होता. मात्र त्याला वाटायचं की, आईनी असं बेहिशोबी वागू नये. पण एकीकडे त्याला वाटायचं की, आपण आईला कांही बोललो तर, तिचा अपमान होईल. म्हणून तो

आईला कधी कांही बोलायचा नाही. त्याचं आईवर फार प्रेम होतं. आपल्या आईच्या भोळेपणाचा लोक गैरफायदा घेतात, हेही त्याला कळत होतं. आईला न दुखावता त्यावर काय उपाय करावा, हे त्याला कळत नव्हतं.



एकदा काय झालं, भागाबाईला भल्या पहाटे एक स्वप्न पडलं. स्वप्नांत तिला असं दिसलं की, तिच्या घराचं छप्पर तुटलं आहे आणि त्यांतून सोन्याच्या मोहरा गळत आहेत. भागाबाईच ती. ती शेजारीपाजारी सांगत सुटली की, मला आज पहाटे स्वप्न पडलं की, "माझ्या घराचं छप्पर तुटून त्यांतून माझ्या घरांत सोन्याच्या मोहरा पडत आहेत. आता मी खूप श्रीमंत होणार". तिचं बोलणं ऐकून, माणसं

एकमेकांकडे बघून डोळे मिचकावत तिची थट्टा करून हंसत; पण ही गोष्ट भागाबाईच्या गांवीसुध्दा नसे. ती आपल्याच नादांत गुंग झालेली असायची.

एका दिवशी काय झालं की, कुण्या चोरांनी, दुसऱ्या गांवातल्या एका धनवंत असामीकडे चोरी केली. भरपूर मुद्देमाल त्यांच्या हाती लागला होता. चोरी केल्यानंतर, चोर जंगलांत गेले. चोरीच्या मालाची वाटणी करायला बसले. वाटणी करून झाली. चोरांच्या वाटण्या झाल्या. चोर दमलेही होते. म्हणून आपापला वाटा सुरक्षित ठेऊन ते झोपी गेले.



त्यांच्यातला एक चोर मात्र अजिबात झोपलेला नव्हता. त्यानी फक्त झोपेचं सोग केलं. नंतर थोड्या वेळानी इतर चोर झोपलेले बघून सगळ्याच चोरांचा, चोरीचा मुद्देमाल ठेवलेली सगळी गाठोडी, अलगदपणे गोळा केली; आणि ती घेऊन तो पळत

सुटला; त्याला भीती वाटत होती की, न जाणो, कोणाला तरी जाग यायची आणि ते आपला पाठलाग करायचे. खरं तसंच झालं. कोणी आपली मिळकत चोरणार तर नाहीनां? असा संशय मनांत येऊन कुणी चोर जागे झाले, पाहतात तो काय, खरंच कुणाचंच डबोलं जागेवर नाही. मग ते चहूबाजूंना धावत सुटले. जोरजोरांत ओरडू लागले. त्यांचा आवाज आसमंतात पसरला. ह्या चोरालाही तो कानी आला. तो मनांतून हादरला. त्याला वाटलं की, “आता आपलं कांही खरं नाही. आपण आता मेलोच”.

तो पटकन एका घरांत शिरायला लागला. पण घराचं दार बंद. आंत जाणार तरी कसं? तेवढ्यांत त्याला एक जिना दिसला. तो भराभरा जिना चढून वर गेला. घाईघाईत त्याचा पाय कशालातरी अडखळला; आणि तो जोरांत पडला. तशी त्या छप्पराचा कोनाडा तुटला आणि त्याचं गाठोडं त्याच्या हातांतून निसटलं. तो गाठोडं पकडायचा प्रयत्न करू लागला; त्या प्रयत्नांत त्या गाठोड्याची गाठ सुटली आणि त्यांतून सोन्याची नाणी व दागिने खाली पडायला लागले. ह्या सगळ्या खुडबुडीनी भागाबाई जागी झाली. कंदिलाच्या मिणमिणत्या प्रकाशांत तिनी एक अभूतपूर्व दृष्य पाहिलं. तिला स्वप्नांत दिसलं होतं, तशाच सोन्याच्या वस्तू छप्पर तुटून खाली पडत होत्या. आता ती टक्क जागी झाली; आणि ती छपरांतून पडणाऱ्या दागिने व सोन्याच्या वस्तू उचलून पिशवींत

भरायला लागली. एक पिशवी भरली. दुसरीही भरली. मग वस्तू खाली पडायचं बंद झालं. कारण त्या गाठोड्यांतल्या सगळ्या वस्तू खाली पडून संपल्या होत्या. चोराचे दागिने तर खाली पडले. खाली उतरून ते परत मिळण्याची शक्यता नव्हती. त्यात धोका होता. खाली म्हातारी जागी असून तिची हालचाल दिसत होती.

मग चोरानी बाकीची गाठोडी कशीबशी गोळा केली आणि जिना उतरून तो पुन्हा धावत सुटला. इकडे भागाबाईला, हे कालच्या स्वप्नाप्रमाणे सोनं-दागिने मिळाले, ही बातमी शेजारपाजाऱ्यांना कधी एकदा सांगते, असं झालं होतं. जरा झुंजूमुंजू झाल्याबरोबर, ती इतर लोकांना ही बातमी सांगायला बाहेर पडली. काय घडलं आहे, हे दामूला कळायला जरा वेळच लागला. दामू जागा होईपर्यंत भागाबाई बाहेर निघून गेलेली होती. ती आता ही हकीकत तिखटमीठ लावून सगळ्या गांवाला सांगणार, याबद्दल दामूच्या मनांत कांही शंका नव्हती. आता काय करावं हे त्याला सुचेना.

आपल्याला इतकी धन-संपत्ती मिळाली हे जर शेजाऱ्यापाजाऱ्यांना कळलं, तर आपल्याला धोका आहे, ही गोष्ट त्याच्या लक्षांत आली. मग त्यानी त्या चोराच्या हातून खाली पडलेला माल भरलेल्या पिशव्या, इतर सामानांत लपवल्या. घरांतलं सगळं सामान एकाजागी गोळा केलं. एवढ्यात भागाबाई

सगळ्या गांवाला तिला सोनंदागिने मिळाले, हे सांगितल्याच्या आनंदांत परत आली. ती आल्याबरोबर दामूनी तिचा हात धरला आणि तो आईला म्हणाला, "आई कशी आहेस गं तू"? ती म्हणाली, "मी काय केलंय? मी फक्त सगळ्यांना सांगून आले, की मला सकाळी पडलेलं स्वप्न, रात्री खरं झालं. रात्री खरंच पाऊस पडला घरांत सोन्याचा आणि दागिन्यांचा".

दामूनी कपाळाला हात लावला. काय म्हणावं आपल्या आईला, हे त्याला समजेना. विचार करता करता ही गोष्ट त्याच्या लक्षांत आली की, आता आपण या गांवांत राहणं योग्य नाही. कारण लोकांना आता कळलंच आहे की, आपल्या घरांत संपत्ती आली आहे. आता तर ते आपल्याला खूप त्रास देतील. आपली आई तर अगदी भोळी आहे. म्हणून निश्चितच तिला ते लुबाडतील.

मग दामूनी मामाला फोन करून, काय घडलं आहे, ते सांगितलं. आपल्या बहिणीला सोनं आणि दागिने मिळाले, हे ऐकून मामाला आनंद झाला. पण भागाबाईचा स्वभाव त्यालाही माहित होता. मामाभाच्यांनी विचार विनिमय करून असं ठरवलं की, दामूनी व त्याच्या आईनी आता मामाच्या गांवालाच जाऊन राहावं. मामाशी ठरवल्याप्रमाणे दामू घरांतल्या सामानाची बांधाबांध करायला लागला. भागाबाईला कळेना, दामूचं काय चाललं आहे

ते? भागाबाई गोंधळली. “काय करतोस तू? सगळ्याची बांधाबांध करून आपल्याला कुठे जायचं आहे?” दामू म्हणाला की, “आपल्याला मामाच्या गांवाला जायचं आहे”. ती म्हणाली की, “कशाकरता जायचं?

दामूनी तिला कांही बोलूच दिलं नाही. तो तिला म्हणाला की, आधी बस इथे. मग मी तुला सगळं समजावून सांगतो. “आई, अगं ज्याचं सामान आपल्या घरांत पडलं आहे, तो माणूस पुन्हा येईल न आपलं सामान शोधत. त्याच्या आधीच आपण दुसऱ्या गांवांला निघून जाऊ या. कळलं कां, कां जायचं ते? चल लवकर आटप. आवर भराभरा. आपण जेवण करू आणि लगेच निघू”. भागाबाईच्या कांही फार लक्षांत आलं नाही. ती कांही फारशी तल्लख नव्हती. पण दामू सांगतो आहे, म्हणजे ते बरोबरच असेल म्हणून, ती बरं म्हणाली आणि जेवायच्या तयारीला लागली. तोवर दामूनी सामानाची बांधाबांध केली. जेवण झाल्याझाल्या हातांत सामानाच्या पिशव्या घेऊन, कोणालाही कांही न सांगता ते मामाच्या गांवाला निघून गेले.

नव्या गांवांत मात्र दामूनी आपल्या आईला, त्यांना मिळालेल्या धन-संपत्तीबद्दल कांहीहि, कोणत्याहि कारणानी बोलायचं नाही, हे नीटरीतीनी समजावून सांगितलं. भागाबाईला काय समजलं, देवच जाणे! पण तिच्यावर विश्वास ठेवण्यात कांही

फारसा अर्थ नाही; तिचा स्वभाव कांही बदलायचा नाही; ही गोष्ट दामूच्या ध्यानांत आली. त्यामुळे, नंतर दामूनी आपल्या मामाच्या कानावर या सगळ्या गोष्टी घातल्या. आईच्या या स्वभावावर काय उपाय करायचा, याचा खल मामा भाचा करायला लागले.

मामा म्हणाले, ‘‘बघ दामू , जसे पैसे आले तसेच ते चोरीला गेले, असं आपण तिला सांगू या. काय करायचं, ते मी तुला सांगतो. तुम्हाला मिळालेलं खरं गाठोडं आपण लपवून ठेऊ आणि एक वरवर तसंच दिसणारं दुसरं गाठोडं आपण त्या गाठोड्याच्या जागी ठेऊ या. उद्या सकाळी उठल्यावर, तू असं म्हणायचंस की, मला पहाटे पहाटे एक स्वप्न पडलं होतं की, रात्री चोर येऊन त्यांचं धन-संपत्तीचं गाठोडं पुन्हा चोरून घेऊन गेले. त्याच दिवशी रात्री निजानीज झाल्यावर माझा माणूस येईल आणि आपण ठेवलेलं दुसरंच बनावट गाठोडं घेऊन पळून जाईल. तो चोर पळून जातांना तू आईला जागं करायचं; तिच्या डोळ्यांदेखतच जर गाठोडं चोरीला गेलं, तरच तिचा त्यावर विश्वास बसेल; आणि मग तिच्या सवयीनुसार संपत्ती कशी आली आणि संपत्ती कशी चोरीला गेली, हे ती लोकांना सांगत सुटेल.

ही गोष्ट दामूला पटली. सकाळी उठल्यावर तो आईला म्हणाला की, ‘‘आई मला आता वाईट स्वप्न पडलं की, आपल्याला मिळालेले सगळे दागिने आणि पैसे चोरीला गेले.

म्हणून आपण आपल्याला मिळालेले पैसे व दागिने नीट लपवून ठेऊ या''. मग त्यानी आईच्या नकळत सगळी संपत्ती चांगल्या जागी नीट लपवून ठेवली. नंतर दुसरं एक तसंच दिसणारं गाठोडं त्यानी आईच्या जवळ दिलं. तिला म्हणाला रात्री चांगलं सांभाळ.

त्या रात्री भागाबाई ते गाठोडं उशाशी ठेऊन झोपली. मामाभाच्यानी ठरवल्याप्रमाणे मध्यरात्री, एक माणूस आला आणि त्यानी म्हातारीजवळचं बनावट गाठोडं चोरून नेलं. तेवढ्यांत दामूनी आईला जागं केलं आणि दाखवलं की, बघ आपलं सगळं धन-संपत्ती चोरीला गेली. भागाबाई तर रडायलाच लागली. दामूनीही आपले डोळे पुसले. भागाबाईला पटलं की, आपल्याकडे



खरंच चोरी झाली. आपलं सगळा पैकाअडका, दागिने चोरांनी लुटून नेले.

मामा-भाचा दोघांनी मिळून ठरवलेली योजना व्यवस्थित पार पाडली. आणि भागाबाईचा समज झाला की, खरंच आपल्याकडे चोरी झाली. आता भागाबाई लोकांना आमच्याकडे पैसे कसे आले आणि कसे पुन्हा चोरीला गेले याच्या कथा सांगत असते. प्रत्यक्षांत आता त्यांची संपत्ती सुरक्षित होती. दामूनी मात्र, आपल्या मामाच्या मदतीने एक मळा विकत घेतला. तो आणि त्याची आई, आता त्या मळयांत आनंदानी काम करतात आणि पीक काढतात. ते विकून त्यांची उपजीविका चालते. त्या मळयांत भागाबाई मालकिणीच्या तोऱ्यांत वावरत असते.

तिच्या मुलाच्या दूरदृष्टीमुळे असा आयुष्यांत आमुलाग्र बदल घडला, हे भागाबाईला शेवटपर्यंत कधी समजलंच नाही, इतकी भागाबाई भोळीभाबडी होती.

== **XX** == **XX** == **XX** == **XX** == **XX** ==

# १०. श्रमाची महती

संध्याकाळ झाली तशी, "आजी गोष्ट - आजी गोष्ट", करत मुलं गलका करायला लागली. आजी म्हणाली आधी परवचा म्हणा; मग गोष्ट. मुलांनी पटाप्पट परवचा म्हणून टाकल्या. ( म्हणजे पाढे व इतर पाठांतर ) मग आजीनी त्यांना गोष्ट सांगायला सुरवात केली.

आजी म्हणाली, "मुलांनो, तुम्ही कसे एकमेकांचे भाऊ-बहीण, मित्र-मैत्रिणी असता नं, तसेच लालू आणि श्याम एकमेकांचे



मित्र होते. त्यांची अगदी घट्ट मैत्री होती. लालूशिवाय श्यामला चैन पडत नसे आणि श्यामशिवाय लालूचा दिवस सरता सरत नसे. पण त्यांच्या स्वभावांत मात्र खूपच फरक होता''.

लालू, अगदी नांवाप्रमाणेच फार लाडोबा होता. श्रीमंत वडिलांचा एकुलता एक मुलगा तो, त्याला काय कमी असणार? त्यांनी इच्छा करायच्या आधीच सगळया नव्या गोष्टी त्याला मिळायच्या. तो सकाळी उठायच्या आधीच त्याचा नोकर त्याचा ब्रश - टूथपेस्ट काढून ठेवायचा. अंघोळीचे कपडे बाथरूममध्ये नेऊन ठेवायचा. लालू उठल्यावर त्याची गादी आवरून ठेवायचा. लालूला अगदी इकडचा चमचा तिकडे करावा लागायचा नाही.



सांगा बरं तुमच्यापैकी कोण कोण रोज उठल्याबरोबर, आपली गादी आवरून ठेवतो ते''?

मुलांनी ''आजी मी'', ''आजी मी'' असा गलकाच केला.

''बरं बाबांनो ! तुम्ही सगळी अगदी शहाणी मुलं आहात.'' आजी म्हणाली.

''ए आजी, मी रोज या संजूची गादी उचलतो. तो अजिबात आपली गादी आवरत नाही,'' विजू म्हणाला.

''विजू तू संजूहून मोठा आहेस नं, म्हणून तुला त्याला मदत करावी लागते. उद्या तो मोठा झाला की, तो करील सगळी आपली आपली कामं. होय ना रे संजू करशील ना तू विजूदादाला मदत?'' आजीनी विजूची समजूत काढण्याकरता म्हटलं.

संजू लगेच म्हणाला, ''हो आज्जी, मी मोठा झालो की, माझी सर्व कामं मीच करीन; आणि विजूदादाला मदतही करीन. पण आता पुढे काय झालं ते सांग नां.''

हं, तर मी काय सांगत होते बरं? हं, लालूचं सर्व काम त्याचे नोकरच करायचे. लालूला काय हवं ते, त्यानी फक्त सांगायचाच अवकाश की, लगेच ती गोष्ट त्याच्यासमोर हजर व्हायची. त्याचा सगळा दिवस अगदी आरामात जायचा. कांही मिळवण्यासाठी

स्वतःला धडपड करावी लागते, ही गोष्ट त्याच्या गावीही नव्हती. “आजी, गांवी नव्हती म्हणजे काय”? इति संजू.

“अरे गावीही नव्हती, म्हणजे त्याला माहितच नव्हती. त्याला जाणीवेंत नव्हती. साध्या साध्या गोष्टी मिळवण्यासाठी सामान्य माणसाला किती प्रयत्न करावे लागतात, याची त्याला कल्पनाही नव्हती. पण लालूंचे वडील विचारी होते. त्यांनी त्याला व्यायामशाळेत घातलं होतं. तो रोज नियमितपणे व्यायामशाळेत जायचा.

“आजी आता तू आम्हाला विचारणार नं की, व्यायामशाळेंत कोण कोण जातं म्हणून? अगं आम्ही कोणीच व्यायामशाळेंत जात नाही, पण रोज पहाटे फिरायला जातो. आणि अंघोळीनंतर १२ सूर्यनमस्कार घालतो”. विजूनी आपण होऊनच सांगून टाकलं.

आजी स्वतःशीच हसली आणि म्हणाली, अरे लबाडा, आजीची चेष्टा करतोस होय? यावर सगळीच मुलं हसली. अरे, तुम्ही सगळी शहाणी मुलं आहात हे मला माहित आहे. तSर लालू, नियमित व्यायामशाळेंत जायचा. व्यायाम करायचा. पण घरांतलं काम आपण स्वतः केलं पाहिजे; आपला अभ्यासही आपण नीट

केला पाहिजे; चांगले गुण मिळवायला हवेत, त्यांत खूप आनंद असतो, ही गोष्ट त्याला माहितच नव्हती.



श्यामचं सगळं मात्र लालूच्यापेक्षा अगदी वेगळं होतं. श्यामला आई नव्हती. त्यामुळे त्याला बाबांबरोबर घरांतली कामंही करायला लागायची. त्याची स्वतःची सर्व कामं त्यालाच करावी लागत. श्याम शहाणा होता. त्याला ठाऊक होतं की, जर आपण ही कामं केली नाहीत, तर बाबांना एकट्यांनाच सगळं करावं

लागेल. नेहमीच काम करत राहिल्यामुळे, श्याम कामांत अगदी तरबेज झाला होता. सगळी कामं तो अगदी चुटकीसरशी करुन टाकायचा.

तो घरीच सूर्य नमस्कार घालायचा. व्यायाम शाळेची फी देणं त्याला परवडणारं नव्हतं. असा हा शहाणा श्याम त्याच्या वडिलांचा खूप आवडता होता. ते श्यामला म्हणायचे की, आपण गरीब असलो, तरी खाऊन-पिऊन सुखी आहोत. ज्या गोष्टी लोक पैसे टाकून मिळवतात, त्या आपण कष्ट करुन मिळवतो. एवढाच फरक आहे त्यांच्यात आणि आपल्यात. श्यामला आपल्या वडिलांचं बोलणं फारसं समजायचं नाही. पण आपण वडिलांच्या इच्छेप्रमाणे चांगलं वागलं पाहिजे, अभ्यास केला पाहिजे हे त्याला समजायचं.

होता होता परिक्षा जवळ आली. सारीच मुलं झटून अभ्यासाला लागली. हां हां म्हणता परिक्षा संपली. निकालाचा दिवस उजाडला. श्यामला ९०% गुण मिळाले. त्याचा दुसरा क्रमांक आला. पण लालू मात्र नुसताच पास झाला होता. लालूंच्या बाबांना वाटायला लागलं की, अरे, हे असं उलटं कसं झालं? आपल्या लालूला काय कमी पडलं? त्यांना कांही श्यामचा हेवा वाटत नव्हता. पण आपला मुलगा कुठे तरी कमी पडतो आहे अशा

विचारांनी वाईट वाटत होतं. श्यामजवळ कांही नाही, अभ्यासाला बसायला धड जागासुद्धा नाही. तरी सुद्धा तो ९०% गुण मिळवू शकला; आणि सगळं भरभरून असूनसुद्धा आपला लालू, ५२-५५% गुणांनी पास झाला! दिवसभर हाच विचार त्यांच्या डोक्यांत घोळत होता.

काय कमी आहे लालूला? लालूजवळ सर्व विषयांची पुस्तकं आहेत. शिवाय त्याला ट्यूशनसुद्धा आहे अभ्यासाला भरपूर वेळही आहे. श्यामला तर घरची बाहेरची कामंसुद्धा करावी लागतात. श्यामजवळ तर कधीमधी क्रमिक पुस्तकंसुद्धा नसतात. त्यांना श्यामचं कौतुकच वाटत होतं. पूर्वी त्यांनी श्यामला बक्षीससुद्धा दिलं होतं. पण लालूंच्या विचारांनी त्यांची पाठ सोडली नाही.

लालूंच्या बाबांचा एक जिवाभावाचा मित्र होता. संध्याकाळी ते मित्राकडे गेले. आपल्या मनांतली सारी मळमळ त्याला सांगितली. "हाताशी फारशा कांही सुखसोयी नसतांना, घरची कामं करूनसुद्धा श्याम इतके गुण मिळवतो; माझ्या मुलाजवळ तर सगळंच आहे. कशालाच कांही कमी नाही. तरीही माझा मुलगा ५२-५५% गुणांनी पास होतो. म्हणजे काय? असं कां घडतं आहे? मला तर कांही असं व्हायचं कारण कळत नाही. काय

कारण असेल बरं त्याचं? तू तरी त्याला काय कमी पडतं आहे ते मला सांग". म्हणजे मी त्याची भरपाई करून देतो लालूला. असं लालूच्या वडिलांनी त्यांच्या मित्राला, म्हणजे विनायकरावांना सांगितलं.

विनायकराव म्हणाले, "एकदम अचानक काय सांगू मी? मला विचार करायला लागेल."

मग त्यांनी २-३ दिवसांनी भेटायचं ठरवलं. दोन दिवसांनी विनायकराव आले. लालूंचे बाबा तर विनायकराव काय सांगतात, ते ऐकायला अगदी अधीर झाले होते,. पण विनायकराव म्हणाले, माझा एक मित्र येईल आता. लालूंच्या बाबांना वाटलं की, त्याची शिकवणी लावायची आहे. पण त्यांनी कांही बोलायच्या आंत एकजण आलासुद्धा. त्याच्या हातांत दोन पिंजरे होते. त्यांत ३-३ ससे होते. लालूंच्या बाबांना कळेना की, हा काय प्रकार आहे. माझी समस्या काय आणि विनायक करतो आहे तरी काय! त्यांनी प्रश्नार्थक नजरेनी विनायकरावांकडे पाहिलं; विनायकराव म्हणाले, "थांब जरा. सांगतो तुला सांगतो सगळं".

त्यांनी ते पिंजरे आणि ससे ठेऊन घेतले. तो माणूस निघून गेला. आता ते काय सांगतात हे ऐकायला लालूचे बाबा अगदी अधीर झाले होते. ते म्हणाले, "हे दोन्ही पिंजरे मी इथे ठेवतो.

ह्यांतल्या एका पिंजऱ्यांतल्या सशांना तू रोज पिंजऱ्यांतच खायला द्यायचंस आणि दुसऱ्या पिंजऱ्यांतल्या सशांना स्वतःचं खाणं स्वतः शोधून खायला लावायचं. मी आठ दिवसांनी येईन. तेंव्हा तुला आपोआपच तुझ्या प्रश्नाचं उत्तर मिळेल. एवढे ससे पाहून लालू तर खूषच झाला. त्यांनी आपणहून सशांच्या स्वच्छतेचं काम अंगावर घेतलं. त्यांना खायला देणं, दुसऱ्या तीन सशांना बाहेर सोडणं, त्यांच्यावर लक्ष ठेवणं, या सगळया गोष्टी त्याने आपल्या अंगावर घेतल्या. लालूच्या आईला मात्र ही गोष्ट फारशी आवडली नाही. कारण लालू तिचा फार लाडका होता. त्यानी कशाला असली हलकीसलकी कामं करायची, खंडीभर नोकर असतांना, असं तिला वाटत होतं. ८ दिवसांत लालूनी त्या सशांची अगदी चांगली निगा ठेवली होती. बघता बघता आठ दिवस संपले.

आणखीही दोन दिवस गेले. तेंव्हा विनायकराव पुन्हा आले. आल्या आल्या त्यांनी सांगून टाकलं की, आता यांतल्या कुठल्याच सशांना, आपण कांही खायला द्यायचं नाही सगळ्यांनाच आपापलं खाणं शोधून मिळवू दे. लालू म्हणाला, “असं कां काका?” ते म्हणाले, “असंच. गंमत तर बघ काय होते ती!”

सशांची संध्याकाळची खायची वेळ झाली. आज कोणालाच कांही मिळालं नाही. पण ज्या सशांना रोज आपलं खाणं शोधावं लागत असे, त्यांनी इकडेतिकडे धावपळ करून कांहीतरी खायला शोधून काढलं. पण ज्यांना रोज आयतं खाणं समोर आणून मिळत होतं, ते ससे, खाणं समोर येईल, याची वाट पाहत बसले. त्यादिवशी त्यांना कांहीच खायला मिळालं नाही. ते ससे उपाशी राहिले रात्री. ते पाहून लालूला फार वाईट वाटलं. त्यामुळे तो तिथून निघून गेला.

मग विनायकराव लालूंच्या वडिलांना म्हणाले, आज जे ह्या उपाशी राहिलेल्या सशाचं झालं आहे, तसंच कांहीसं तुझ्या लालूचं होतं आहे. त्याला सगळंच आयतं मिळतं. कांहीतरी मिळवण्याकरता, आपल्याला धडपड करायला हवी, ही गोष्टच त्याला जाणीवेंत नाही. त्याला तू फार आयतोबा बनवून ठेवलं आहेस. त्याच्या सवयी बदल. मग बघ, त्याच्यांत काय फरक पडतो ते!

मग लालूंचे बाबा लालूंच्या आईशी बोलले. विनायकराव काय म्हणाले, ते त्यांनी लालूच्या आईला सांगितलं. तिला ते फारसं आवडलं नाही. पण ती म्हणाली, “मी तुम्ही सांगाल तसंच वागेन. आपला लालू चांगला हुशार झाला पाहिजे”.


दुसऱ्या दिवशी सकाळी बाबा लालूला म्हणाले, "बेटा तुला ट्यूशन लावून सुद्धा, इतके कमी गुण मिळतात. मला वाटतं तुला त्या ट्यूशनचा कांहीच फायदा होत नाही आहे. तेंव्हा आपण सध्या तुझा शिकवणीवर्ग बंद करून टाकावा". हे ऐकून लालूची मान खाली गेली. त्याला कांही बोलता येईना. बाबाही त्याला रागवत नव्हतेच. मग त्यांनी हळुहळू करत लालू स्वतःची कामं स्वतः करेल, अशी परिस्थिती निर्माण केली. नोकरांना लालूंची कामं करायला बंदी केली. लालू त्यांना कांहीच म्हणू शकला नाही. त्याला स्वतःची कामं स्वतःलाच करायला लागत होती. स्वतःचा अभ्यास स्वतःच जबाबदारी घेऊन करावा लागत होता.

पण मजेची गोष्ट अशी होती की, या कशाचाही त्रास त्याला होत नव्हता. उलट एक प्रकारची जबाबदारीची जाणीव त्याच्या मनांत निर्माण होत होती. त्याचा आत्मविश्वास वाढीस लागला होता. ह्या सगळ्या नवीन गोष्टीचा त्याला आनंद मिळत होता. त्याच्या आईला मात्र लालूवर किती अन्याय होतो आहे, असं वाटत होतं. पण लालूच्या बाबांपुढे ती कांही बोलू शकत नव्हती. होता होता परिक्षेचे दिवस आले; लालू चांगलाच अभ्यासाला लागला होता. त्याचा परिणाम परिक्षेंतही दिसला. लालूला या परिक्षेंत ७४% गुण मिळाले. शाळेंतल्या शिक्षकांनी त्याला शाबासकी दिली.

घरी आईबाबांनाही आनंद झाला. त्यांनी लालूला छानसं बक्षीस दिलं. यामुळे लालूला आपल्यावरच्या जबाबदारीची जाणीव झाली. त्याच्या वागण्यात खूप फरक पडला. तो सगळ्यांचाच आवडता झाला. मुलांनो या गोष्टीचं सार काय सांगा बरं !

आजी, माणसांनी सतत काम करत राहिलं पाहिजे. म्हणजे मनाला आणि शरीरालाही बरं वाटतं.

दुसरा मुलगा म्हणाला, “आजी, आपण स्वतः हातांनी काम केल्याशिवाय आपल्याला यश मिळत नाही.” आजी म्हणाली, “दोघांचंही बरोबर आहे. चला पळा आता जेवायला. उद्या दुसरी गोष्ट.





अरुंधती बापट यांची

प्रकाशित पुस्तके.

कव्हरवर क्लिक

करताच उघडतील.



## ई साहित्य प्रतिष्ठानचे हे चौदावे वर्ष.
## अरुंधती बापट यांचे हे चवथं पुस्तक.

अरुंधती बापट यांना साहित्याचं बाळकडू घरातूनच मिळालं आणि रक्तात आलं. त्यामुळे लेखन करणं हा त्यांचा "स्व"भाव आहे. आणि ते लेखन त्या स्वांतःसुखाय करतात. ते प्रसिद्ध व्हावे यासाठी प्रयत्न करण्याचा त्यांचा "स्व"भाव नाही. आणि त्यातून काही मिळावे ही अपेक्षा अजिबात नाही. पैसा, नाव, पुरस्कार काहीच. त्यांच्या लेखनात कोणाला काही शिकवण्याचा आव नसतो. पण तरीही त्यातून संस्कारांची पेरणी व्हायची ती होतेच. त्यांच्या लेखणीचे हेच वैशिष्ट्य आहे. अरुंधती बापट यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते.

मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर दिनानाथ मनोहर(४पुस्तके), शंभू गणपुले (९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (२०), शुभांगी पासेबंद(११), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(८), डॉ. नितीन मोरे (३१), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(२), अनंत पावसकर(४), मधू

शिरगांवकर (६), अशोक कोठारे (५० खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १७ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (८), डॉ. वृषाली जोशी(२४), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (१२), अंकुश शिंगाडे(११), आनंद देशपांडे(४), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(३) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(४) अरुण कुळकर्णी(८), मधुकर सोनवणे(५) असे ज्येष्ठ व अनुभवी लेखक ई साहित्यच्या माध्यमातून आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं ’इ’यें ।

दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।